दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -१२९ | मंगळवार दि.१३ जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-129 | Tuesday, Dt.13 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# परळीतील 'मिश्र' युती अखेर तुटली

## शिंदेंच्या शिवसेनेच्या संतापानंतर एमआयएमची गटातून माघार

### नगरसेविकेचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

परळी /प्रतिनिधी

परळी नगरपरिषदेत गटनेता निवडीवरून सुरू असलेला शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मधील संघर्ष अखेर शांत झाला आहे. शिवसेनेने घेतलेल्या तीव्र आक्षेपानंतर आणि एमआयएमला बाहेर काढा, अन्यथा आम्ही बाहेर पडू, या इशाऱ्यानंतर एमआयएमच्या नगरसेविकेने या गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महायुतीमधील वादाची ठिणगी तूर्तास विझली असली, तरी या प्रकरणाने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा घडवून आणली.

राज्यात नुकत्याच नगरपरिषदेच्या निवडणुका पार पडल्या. परळी नगरपरिषदेत अजित पवारांची राष्ट्रवादी आणि भाजपने एकहाती सत्ता मिळवली होती. मात्र, परळी नगरपरिषदेत गटनेता निवडीसाठी स्वाक्षऱ्या करताना एमआयएम पक्षाला सोबत घेतल्याचे समोर आले होते. ही बाब समजताच स्थानिक शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट पसरली होती.

एमआयएमची सन्मानपूर्वक माघार

शिवसेनेच्या इशाऱ्यानंतर आणि वाढत्या राजकीय दबावानंतर एमआयएमने स्वतःहून पाऊल मागे घेतले आहे. नगरसेविका आयेशा मोहसीन शेख यांनी गटनेते वैजनाथ सोळंके यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, आम्ही या गटातून बाहेर पडत आहोत. या पत्राची प्रत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनाही पाठवण्यात आली आहे. यामुळे




परळीतील सत्तेचे समीकरण आता पुन्हा एकदा बदलणार आहे.

अंबादास दानवेंच्या 'त्या' पोस्टमुळे खळबळ

दरम्यान, या वादाची ठिणगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांच्या एका सोशल मीडिया पोस्टमुळे पडली. दानवे यांनी परळीत राष्ट्रवादी, शिवसेना आणि एमआयएम एकत्र आल्याचे 'एक्स'वर जाहीर केले होते. या विचित्र युतीमुळे हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून शिवसेनेवर (शिंदे गट) विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती. स्वतःच्याच बालेकिल्ल्यात बॅकफूटवर गेलेल्या शिवसेनेने अखेर पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली.

एक तर एमआयएम राहील किंवा आम्ही...

शिवसेनेचे (शिंदे गट) जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी राष्ट्रवादीला थेट इशारा दिला होता. एमआयएमसारख्या जातीवादी पक्षाला सोबत घेतल्याची आम्हाला कल्पना नव्हती. जर राष्ट्रवादीला शिवसेनेसोबत युती टिकवायची असेल, तर एमआयएमला तात्काळ बाहेर काढा, अन्यथा आम्हाला या गटातून बाहेर जाण्याची परवानगी द्या, असा आक्रमक पवित्रा मुळूक यांनी घेतला. आम्ही हिंदुत्वाला तडा जाऊ देणार नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले होते.

परळी नगरपरिषदेत गटनेता निवडीवरून सुरू असलेला शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मधील संघर्ष अखेर शांत झाला आहे. शिवसेनेने घेतलेल्या तीव्र आक्षेपानंतर आणि एमआयएमला बाहेर काढा, अन्यथा आम्ही बाहेर पडू,



अंबाजोगाई - अंबाजोगाई नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष श्री नंदकिशोर काकाजी मुंदडा यांना विजयी झाल्याबद्दल दैनिक समर्थ राजयोग आणि पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करून बीड येथे मार्च महिन्यात होणाऱ्या पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय मेळाव्याचे सत्कारमूर्ती म्हणून जाहीर निमंत्रण देताना पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला बीड जिल्हाध्यक्ष शेख आयेशा मॅडम.



परळी वैजनाथ - राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून परळी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, विद्यमान नगराध्यक्ष पद्मश्री धर्माधिकारी यांनी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांचा जिजाऊ गार्डनमध्ये नगरपालिकेच्या वतीने जाहीर सत्कार केला. यावेळी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह उपस्थित नवनिर्वाचित नगरसेवकांसह मान्यवर.

### परळीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ पद्मश्री धर्माधिकारी यांचा

## सत्कार आणि पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय मेळाव्याचे निमंत्रण

परळी /प्रतिनिधी

परळी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी राष्ट्रवादी महायुतीच्या उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी सर्वाधिक मताने विजय मिळवल्याबद्दल त्यांचा दैनिक समर्थ राजयोग आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून परळी वैजनाथ येथे जाहीर सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देताना संपादक तथा प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी. यावेळी महिला बीड



जिल्हाध्यक्ष शेख आयेशा मॅडम यांच्यासह नवनिर्वाचित गटनेते, नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परळी वैजनाथच्या नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांना मार्च महिन्यामध्ये बीड येथे पत्रकार संघाच्या होणाऱ्या राज्यस्तरीय मेळाव्याचे या निमित्ताने अधिकृत निमंत्रण देण्यात आले. त्यांनी निमंत्रण स्वीकारून कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहील आणि आपण माझा जो सन्मान करणार आहात त्याबद्दल मी कृतज्ञ राहील अशा भावना व्यक्त केल्या.

## चोर नेकनूर पोलीस मौसेरे भाई; कोपरापर्यंत ओघळ येईपर्यंत लोकांना खाई

### नेकनूरच्या बाजारातून १५ किलो चांदी चोरीला

बीड ।प्रतिनिधी

ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावीं चा कारभार वाखाणण्याजोगा आहे. त्यांनी चक्क नेकनूरसह चौसाळ्याचा आठवडी बाजार चोरांना आंदण दिला असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. सणाच्या ऐन मोक्यावर नेकनूरच्या आठवडी बाजारातून सराफा व्यापाऱ्याची १५ किलो चांदी असलेली पेटीसह ५० हजार रुपयांची रोकड डल्ला मारून चोर घेऊन गेला. व्यापाऱ्यावर जवळपास ३५ लाख रुपयाची संक्रांत आली.विशेष म्हणजे ही घटना पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर सकाळी दहाच्या सुमारास घडल्याने खळबळ माजली आहे. पोलिसांच्या कृपेने या घटनांमध्ये वाढ झाल्याचा आरोप होऊ लागला आहे. मोबाईल चोरीला गेला, खिसा कापला गेला, महिलांच्या गळ्यातील दागिने गेले तर पोलीस ठाण्यात तक्रारदाराचीच होणाऱ्या उलट तपासणीमूळे नव्या मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते त्यामुळे तक्रारी ही करायला कुणी धजावत नाही तपास व्हायचा तर विषयच येत नाही अशा चोर पोलिसांच्या अडकित्यात जनता मात्र भरडली जात असताना एसपी मात्र कायदा सुव्यवस्थेची घडी बसवल्याचा ढोल कशाच्या जीवावर वाजवत आहेत. असा प्रश्न विचारला जात आहे.

नेकनूर चा आठवडी बाजार जनावरांच्या खरेदी विक्रीसाठी प्रसिद्ध आहे. पण सध्या तो चोरांचा बाजार बनलं असल्याचं पाहायला मिळत आहे. मोबाईल चोर, खिसे कापू यांना

(उर्वरीत पान २ वर)

## तळणीत नागरी वस्तीत स्फोटक साठ्याचा संशय

स्थानिकात भिंतीचे वातावरण

तळणी वार्ताहर : मंठा तालुक्यातील तळणी येथील बसस्थानक परिसरात एका घरासमोर जिलेटिन कांडी वाहतूक करणारे वाहन उभे असल्याचे आढळून आल्याने नागरी वस्तीत स्फोटक साठवणुकीचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### पोलिसांकडून तपासणी

जिलेटीन कांड्या या अत्यंत स्फोटक स्वरूपाच्या असून संबंधितांकडून विहीर खोदकाम, डोंगर फोडणे, रस्ते बांधकाम तसेच मोठे दगड व खडक फोडण्याची कामे केली जात असल्याची वापर केला जातो. मात्र, अशा स्फोटक पदार्थांचा साठा थेट नागरी वस्तीत असणे म्हणजे

(उर्वरीत पान २ वर)

## संशयावरुन पोलिसांनी पकडलेला संशयित निघाला अट्टल गुन्हेगार

बीड ।प्रतिनिधी

रात्रीची गस्त घालत असताना माळवेस भागात स्कार्पिओ गाडीमध्ये बसलेल्या इसमाला बीड शहर पोलिसांनी हटकले असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यामुळे संशय वाढल्याने पोलिसांनी गाडीची तपासणी केली असता आत धारदार कोयता निघाला. गाडीसह संशयताला पोलीस ठाण्यात आल्यानंतर तो अट्टल गुन्हेगार असल्याचे उघड झाले. पोलिसांच्या या धाडसी



कारवाईबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

बीड शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे, त्यांच्यासोबत पोलिस

(उर्वरीत पान २ वर)

### डिजिटल शिक्षणाचा गाजावाजा करणाऱ्या जिल्हा प्रशासनाला

## पारधी वस्तीवरील शाळेत साधा फळाही नाही याची लाज वाटत नाही का - डॉ. गणेश ढवळे

बीड /प्रतिनिधी

एकीकडे शासन व प्रशासन डिजिटल शिक्षण या नावाखाली टॅबद्वारे मनोरंजनात्मक शिक्षण देत असल्याचा गाजावाजा करत कोट्यवधी रुपयांचा खर्च करत आहे. मात्र दुसरीकडे बीड तालुक्यातील बोरखेड ग्रामपंचायत

(उर्वरीत पान २ वर)



## मार्च महिन्यात पत्रकार संघाचा बीडमध्ये राज्यस्तरीय मेळावा..!

### विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तिमत्त्वांनी पुरस्कारासाठी संपर्क साधावा

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचा बीड येथे मार्च महिन्यात राज्यव्यापी मेळावा घेण्यात येणार आहे. या मेळाव्यामध्ये पत्रकार संघाच्या वतीने बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार व्यक्तिमत्वाला मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. याकरता विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तिमत्त्वांनी पुरस्कारासाठी संपर्क साधावा असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला बीड जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांनी केले आहे.

बीड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचा पहिल्यांदाच राज्यव्यापी मेळावा मार्च महिन्यामध्ये आयोजित करण्यात आला आहे. या राज्यव्यापी मेळाव्याला महाराष्ट्रातील आयडॉल असलेले व्यक्तिमत्व प्रमुख अतिथी म्हणून लाभणार आहेत.

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# वीज अपघात आणि सुरक्षा : सजगता हाच उपाय

**मानवी जीवनामध्ये विजेचा वापर दिवसेंदिवस वाढतच चालेला आहे. मात्र वीज सुरक्षेकडे फारसे लक्ष दिल्याचे आढळत नाही. विद्युत उपकरणांची योग्यरीत्या हाताळणी न केल्यामुळे व फाजील आत्मविश्वास बाळगल्याने होणा-या वीज अपघातांमुळे जीवितहानी होण्याचे आणि कोटयवधी मालमत्तेचे नुकसान होण्याचे प्रमाण कमी होत नसल्याचे दिसून येत आहे. सर्वसामान्य लोकांचे आणि विद्युत क्षेत्रात काम करणा-यांचे जनजीवन सुरक्षित राहावे, यासाठी विजेचा सुरक्षितरीत्या वापर होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती होण्याच्या दृष्टीने ऊर्जा विभागाच्या वतीने ११ जानेवारी ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात येत आहे.**

- धनंजय पवार जनसंपर्क अधिकारी, महावितरण,लातूर

शॉर्टसर्किटपासून होणारे अपघात असोत की, वीज हाताळताना होणारे अपघात असोत, सुरक्षा ही अधिक महत्वाची झालेली आहे. शहरापासून ते ग्रामीण भागापर्यंत विजेपासून होणा-या अपघाताच्या घटना पाहता आता अधिक सतर्कतेने, सुरक्षितपणे विजेचा वापर करणे क्रमप्राप्त झाले आहे. याकरिता आता अधिक प्रभावीपणे जनजागृती होण्याची आवश्यकता आहे.

चुकीला माफी नाही : 'वीज' ही अशी आहे जी हाताळतांना किंवा वापरताना काळजी घेतली नाही तर होणा-या परिणामांना टाळता येत नाही. वीज वापरात चुकीला माफी नाही. त्यामुळे वीज उपकरणे वापरताना काय करु नये, याचा नक्की विचार करावा लागणार आहे.

दर्जेदार उपकरणांचा वापर: घर, उद्योग कार्यालय अथवा शेती असो वीज वापरतांना प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. वीज पुरवठा घेताना किंवा वेळोवेळी विद्युत केबलस्विचेस अथवा इतर उपकरणे ही आयएसआय प्रमाणीत असल्याचे व योग्य क्षमतेचे असल्याची खात्री करावी. विद्युत सर्किटवर क्षमतेपेक्षा जास्त भार टाकू नये. प्रमाणीत ठेकेदारांकडुनच विद्युतीकरणाची कामे करुन घ्यावीत. वायरिंगसाठी योग्य क्षमतेचे एमसीबी (मिनिएचर सर्किट ब्रेकर) वापरावे जेणे करुन अतिभार किंवा शॉर्टसर्किटमुळे धोका निर्माण होणार नाही. गुणवत्ता नियंत्रण मंडळाने प्रमाणित केलेली विद्युत उपकरणे वापरावीत. उदा. मिक्सर पाण्याचे हीटर, टोस्टर ग्राईंडर, फ्रिज, डीप फ्रिजर, वॉशिंग मशीन इत्यादी.

योग्य अर्थिंगचा वापर: वीज वापरामध्ये अर्थिंग हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. अनेक उपघात हे योग्य प्रकाराची अर्थिंग न केल्यामुळे घडल्याचे सिध्द झालेले आहे. त्यामुळे वायरिंग इंन्स्टॉलेशनसाठी कॉपर प्लेट किंवा कॉपर रॉडची अर्थिंग कार्यक्षमपणे घेणे सुरक्षेच्या दृष्टीने गरजेचे आहे.

ईएलसीबी,इन्सुलेटेड वायरचा उपयोग : अर्थ लीकेजपासून होणारा धोका टाळण्यासाठी ईएलसीबी (अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर) वापरावे. मोठमोठया अपार्टमेंटमध्ये २० ते ५० मीटरची स्वतंत्र मीटर रुम असते. बऱ्याच वेळा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मीटर रुम स्वच्छ प्रकाशित व हवेशीर असली पाहिजे, पावसाळयात मीटर रुममध्ये पाणी जाणार नाही, त्याचबरोबर भिंती ओल्या होणार नाहीत याची कळजी घ्यावी मीटर रुमचा वापर स्टोअर रुम म्हणुन करु नये, मीटर रुममध्ये उंदरांचा वावर होणार नाही, याकडेही लक्ष दिले पाहिजे. ज्वालाग्राही पदार्थही ठेवणे टाळायला हवे. न्युट्रल वायरसाठी उघडया वायरचा वापर न करता इन्सुलेटेड वायरचाच वापर करा. एका सर्किटमध्ये मल्टी प्लग / तारा घालू नका. त्यामुळे शॉर्टसर्किटमुळे आगीस निमंत्रण दिले जाते.

मेन स्विचचा वापर: शॉर्टसर्किटमुळे आग लागल्यास प्रथम मेन स्विच बंद करा. विद्युतरोधक अग्निशमनचा वापर करा. पाण्याचा वापर करु नका. प्लग, पिन, बटण, बोर्ड यांना तडे गेल्यास ती त्वरित बदलावीत. पंखे, इस्त्री, कूलर वापरतांना त्यात वीजप्रवास उतरु शकतो. याची जाणीव ठेवूनच सावधानतेने ती हाताळावीत.

जीवनमूल्य जाणूनच काम करणे: विजेविषयी अज्ञान असणे, ही गोष्ट जितकी भयानक आहे त्याही पेक्षा ज्ञान असूनही निष्काळजीपणा, फाजील आत्मविश्वास हे अधिक भयंकर आहे. अति उत्साहात अगदी निष्णात लोक देखील हातात रबरी ग्लोव्हज घालणे, पायात सेफ्टी बूट वापरणे, तसेच, वीज पुरवठा बंद करुन मग काम करणे, अशा छोटया-छोटया बाबींकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे जीवितहानी झाल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. रात्रंदिवस विजेच्या क्षेत्रात काम करणारे कामगार, जनमित्र, वायरमन यांनी आपले जीवीनमूल्य जाणून घेऊन आपल्यावर आपल्या कुटूंबाचीही जबाबदारी असल्याचे भान ठेवूनच विद्युतीकरणाचे काम करावे. सुरक्षेचे उपाय हे केवळ आपल्यासाठी नसून आपल्याशी निगडित प्रत्येक घटकासाठी तितकेच महत्वाचे आहेत, याची जाणीव सातत्याने ठेवणे महत्वाचे आहे.

पतंग उडवताना घ्या काळजी

जानेवारी महिना म्हटले की पतंगोउत्सवाची पर्वणीच असते. मकर संक्रातीचे वेध लागले की पतंग प्रेमी मध्ये एक नवा उत्साह संचारत असतो. शहरात मोकळी मैदाने जवळपास नष्ट झाल्यातच जमा आहेत. त्यामुळे पतंगप्रेमीसाठी घरावरील छत हा ऐकमेव पर्याय असतो. याप्रसंगी आजूबाजूला वीजवाहक तारा असतात याचे भान राहत नाही परिणामी निष्काळजीपणामुळे चीजतारांमध्ये अडकलेले पतंग काढायला जावून जीवघेण्या दुर्घटना घडतात. त्याचबरोबर सध्या धातू मिश्रीत मांजा वापरण्याचे प्रमाण वाढले असून, प्राणांकीत अपघातही वाढले आहेत. त्यामुळे पतंग उडवताना धातू मिश्रीत मांजाचा वापर टाळावा.

दैनंदिन वीज वापरातील महत्वाच्या बाबी

विद्युत उपकरणे ओल्या हाताने हाताळू नका. वीजवाहिनीच्या खाली किंवा जवळ कोणतेही बांधकाम करु नका. विद्युत खांब किंवा तणाव तारांना गुरे, ढोरे बांधू नका. विद्युत प्रवाह सोडू नका. तात्पुरते लोंबकळणारे वायर वापरु नका. विजेचा अनधिकृत वापर टाळा. कुलरमध्ये पाणी टाकताना वीज पुरवठा बंद ठेवा. विजेच्या तारेखाली कापलेले पीक ठेवू नका. कपडे वाळवण्यासाठी वीज तारांचा वापर करु नका. गंमत म्हणुन विजेच्या खांबावर चढणे टाळा. विजेच्या तारतुटून जमिनीवर पडल्या असतील तर त्यांना स्पर्श करु नका किंवा त्या ओलांडून जाण्याचा प्रयत्न करु नका व इतरांनाही तसे करु देऊ नका. त्वरित जवळ असलेल्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधा.

संपादकीय....

## शून्य किंमत

निष्ठावंत कार्यकर्त्यांना शून्य किंमत देशात आणि राज्यात मूळ संघ, भाजपचे कार्यकर्ते आणि नेतेच पक्षात अल्पसंख्यांक झाले आहेत. ज्यांनी कठीण काळात पक्ष वाढवला, संकटात झेंडे हातात घेतले, सत्ता नसताना उपेक्षा आणि अपमान सहन केले.

असंगाशी संग आणि विचारांना तिलांजली ही स्वत:ला पार्टी विथ डिफरन्स म्हणवून घेणाऱ्या भाजपची सध्याची स्थिती आहे. नैतिकता, शूचिता आणि मूल्याधिष्ठित राजकारणाचे गोडवे गाणाऱ्या भाजपने या घोषणेला तिलांजली दिल्याचे दिसत आहे. सत्ता मिळवण्यासाठी भाजपच्या लोकांनी एखाद्या हत्याराप्रामणे नैतिकतेचा वापर केला आणि आज सत्ता मिळवणे आणि टिकवण्यासाठी भ्रष्ट अनैतिक लोकांचा आणि पद्धतींचा वापर करून नैतिकतेला फासावर लटकवले आहे. घराणेशाही, भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून सातत्याने काँग्रेसला शिव्या देणाऱ्या भाजपची नैतिकता सत्तेच्या अवघ्या १० वर्षांत पार रसातळाला गेली. नगरपालिका निवडणुका ज्या पद्धतीने लढवल्या आणि निकालानंतर ज्या पद्धतीने आघाड्या केल्या त्या भाजपचे खरे रूप दाखवतात.

अकोटमध्ये भाजप-एमआयएमचे गळ्यात गळे

नगरपालिका निवडणुकीत सत्ता आणि पैशाचा महापूर आणून भाजपने राज्यात सर्वात जास्त नगरपालिकांत विजय मिळवला. अकोला जिल्ह्यातील अकोट नगरपालिकेचा उपनगराध्यक्ष आणि विषय समित्यांच्या निवडीसाठी एमआयएम या पक्षाशी आघाडी केली. ज्या एमआयएमला भाजपचे गल्लीपासून दिल्लीपर्यंतचे नेते दररोज शिव्या घालतात त्या एमआयएमच्या गळ्यात गळा घालून भाजपने शहर विकास मंच आघाडीची स्थापना केली. भाजपच्या या ढोंगीपणावर टीका झाल्यावर एमआयएम प्रमुख खा. असदुद्दीन ओवैसी यांनी आघाडी तोडण्याचे आदेश त्यांच्या स्थानिक पदाधिकारीऱ्यांना दिले. भाजपने फक्त दिखाव्यासाठी काही जणांना नोटीस दिल्या. पण आघाडी तोडली नाही. त्यामुळे आजही भाजप- एमआयएमची युती अस्तित्वात आहे. अकोटसारख्या एका छोट्या नगरपालिकेची सत्ता मिळवण्यासाठी भाजपने केलेली ही अभद्र युती पाहता भाजप सत्तेसाठी काय करू शकतो याची आपल्याला कल्पना येते.

बदलापूर-अंबरनाथ पॅटर्न

बदलापूर नगरपालिकेत सत्ता मिळवल्यानंतर भारतीय जनता पक्षाने शाळकरी मुलीवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी तुषार आपटे याची स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केली. आपटे जेलमध्ये असायला हवा होता. भाजपने त्याला नगरपालिकेच्या सभागृहात नेऊन बसवले. बलात्काराच्या प्रकरणात जेलमधून जामिनावर बाहेर आलेल्या लोकांचे सत्कार करणाऱ्या पक्षाने छोट्या मुलीवरील अत्याचार प्रकरणातील आरोपीला स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्त करत आम्ही असेच आहोत हे पुन्हा दाखवून दिले आहे. अंबरनाथ नगरपालिकेत भाजपने काँग्रेस पक्षाच्या एका स्थानिक नेत्यावर दबाव आणून त्याला फोडून काँग्रेसच्या नगरसेवकांना सोबत घेऊन आघाडीची स्थापना केली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संबंधितांना निलंबित केले. पण भाजपने त्या नगरसेवकांवर यंत्रणेमार्फत दबाव आणून त्या नगरसेवकांना पक्षात घेतले.

**CHANGE IN ADDRESS**

Name : NANDKISHOR GULABRAO BHALKE
I AM CHANGING MY ADDRESS : WEERKHEDA BHALKI PO.JAFRABAD
DIST.JALNA, PASSPORT ISSURANCE
Old Address : At. TAlawali Datta Nagar, Mhatre Wadi Talawli, Talavapali, Ghansoli, Navi Mumbai
and New Address is WEERKHEDA BHALKI PO.JAFRABAD, Dist.Jalna -431206
Mo.9221577869

## जनतेचा आवाज असलेलं वर्तमानपत्र आज पुन्हा उभं राहण्याची गरज

एकेकाळी समाजाला दिशा देणारे, अन्यायाविरोधात निर्भीडपणे उभे राहणारे आणि सामान्य माणसाचा खरा आवाज बनलेले माध्यम म्हणजे वर्तमानपत्र. वर्तमानपत्रातील एखादी बातमी किंवा संपादकीयातील ठसकेबाज हेडलाईन इतकी प्रभावी असायची की सत्तेच्या दालनात खळबळ उडायची. इतिहास साक्ष देतो, एकेकाळी वर्तमानपत्रांच्या निर्भय लेखनामुळे मंत्रीपदाचे राजीनामे दिले गेले. शब्दांची ताकद, सत्याची धार आणि जनतेचा रोष हेच त्या काळातील माध्यमाचं खरं भांडवल होतं.

त्या काळी संपादकीय म्हणजे केवळ मत नव्हतं, तर जनतेचा जाब असायचा. सामान्य माणसाच्या वेदना, अन्याय आणि प्रश्न इतक्या प्रामाणिकपणे मांडले जायचे की सरकारलाही त्याची दखल घ्यावी लागायची.सोशल मिडिया, टीआरपी किंवा दिखाव्याचा गाजावाजा नव्हता, तरीही वर्तमानपत्रातील काळ्या शाईतून उठलेला आवाज थेट मंत्रालयाच्या दरबारात पोहोचायचा.मात्र आज परिस्थिती बदलत चालली आहे. सोशल मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या झगमाटात सत्यापेक्षा दिखाव्याला अधिक महत्त्व दिलं जात आहे. विश्वासार्हतेपेक्षा आकर्षण महत्त्वाचं ठरत आहे. याच प्रवाहाचा परिणाम वर्तमानपत्रांवरही होताना दिसतो आहे. सरकारी जाहिरातींच्या अपेक्षेपोटी अनेकदा सरकारविरोधात ठाम भूमिका घेताना वर्तमानपत्रे दिसत नाहीत. विरोधकांची बाजू भक्कमपणे मांडली जात नाही.

शैक्षणिक फीतील अवाढव्य वाढ, वाढती महागाई, बेरोजगारीमुळे हतबल झालेला तरुण, महिलांवर होणारे अन्याय, शेतकऱ्यांचे प्रश्न, अशा नागरिकांच्या असंख्य गंभीर विषयांवर सातत्याने सरकारला जागं करणारे संपादकीय आज अपवादात्मक ठरत आहेत. त्यामुळेच सामान्य माणसाचा विश्वास हळूहळू वर्तमानपत्रांवरून आणि संपादकांवरून उडत चालला आहे. परिणामी, वर्तमानपत्रांची जागा कमी होत आहे, वाचकसंख्या घटत आहे. आज खऱ्या अर्थाने वेळ आली आहे की वर्तमानपत्रांनी पुन्हा एकदा आपली जुनी ओळख परत मिळवावी. कोणत्याही दबावाला न झुकता, निर्भीडपणे प्रश्न विचारावेत, सत्तेला आरसा दाखववा आणि जनतेच्या बाजूने ठामपणे उभं राहावं. वर्तमानपत्र जेव्हा जनतेच्या मनात पुन्हा विश्वास निर्माण करेल, तेव्हाच ते लोकशाहीचा खरा आधारस्तंभ ठरेल.



आजही जनतेला वर्तमानपत्रांची गरज आहे, बातम्यांसाठी नव्हे, तर सत्यासाठी, न्यायासाठी आणि निर्भय आवाजासाठी. वर्तमानपत्र पुन्हा एकदा जनतेचा आवाज बनेल, हीच अपेक्षा.

आपला नम्र
गेली ३५ वर्षे प्रामाणिकपणे
वृत्तपत्र व्यवसाय करणारा
एक सामान्य वृत्तपत्र विक्रेता.
भालुसिंग भारद्वाज जाफराबाद




## स्वामी विवेकानंद महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रामाबाद येथे दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी प्राचार्य डॉ विवेक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.विलास पवार हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ आर.बी.मादळे व प्रा. डॉ एस.एल.सकनुरे हे उपस्थित होते. यावेळी डॉ मादळे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवन व कार्यावरप्रकाश टाकला तर डॉ सूर्यकांत सकनुरे यांनी राजमाता जिजाऊ यांचे स्वराज्य निर्मितीत याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ.आर.बी.बाविस्कर यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्रा.बी. डब्ल्यू.बाळबुधे, डॉ आर.एम. बिडवे, डॉ एकनाथ भिंगोले,डॉ जितेंद्र काळे, प्रा आर.आर.बिरादार, डॉ.दिलीप काळे, प्रा आर.एस. ढोकाडे, प्रा अंकुश शिदे, श्री संतोष पाटील, श्री बालाजी सादगिरे उपस्थित होते. उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ मा.म. गायकवाड यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

**अंकुशनगर बीड....**

की, सदर गुन्ह्यातील फरार आरोपी हा कळंब येथून केजकडे येणार आहे. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्तरित्या सापळा लावून आरोपी विशाल संजय सूर्यवंशी यास केज शिवारात कळंब ते केज रोडवर कमल पेट्रोलपंपाजवळ पास पकडण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचे पुढील तपास कामी आरोपी व त्याने वापरलेली मोटार सायकल ही पोलीस स्टेशन शिवाजीनगर बीड यांचे ताब्यात देण्यात आलेली असून गुन्ह्याचा पुढील तपास पो. नि. प्रविण कुमार बांगर हे करत आहेत.

सदरील कामगिरी ही श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, प्रविण बांगर पोलीस निरीक्षक, शिवाजीगनर यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार राहूल शिंद मनोज वाघ, पोलीस अंमलदार मनोज परजणे, अश्पाक सय्यद, अर्जुन यादव, विकी सुरवसे, चालक पो.ह. नितीन वडमारे, सिध्देश्वर मांजरे सर्व व पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथील सहा.पो.उप निरीक्षक बलराज सुतार, पोह रविंद्र आघाव, अनंत गिरी पोअ सुदर्शन सारणीकर यांनी संयुक्तरित्या केली आहे.

**जालन्यात एसीबीचा...**

परिषद् जालना. मागणी ७,००० रुपये. रंगेहाथ पकडले २,००० रुपये स्वीकारताना. कारवाईचा दि. १२ जानेवारी २०२६.भ्रष्टाचाराला थारा नाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या कारवाईद्वारे भ्रष्ट अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा दिला आहे. कोणत्याही कामासाठी पैशांची मागणी झाल्यास घाबरून न जाता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.सध्या संबंधित आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून जालना एसीबी पथक या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहे. या कारवाईमुळे सर्वसामान्य नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

**संशयावरून पोलिसांनी....**

अंमलदार इलियास शेख, अफसर बागवान, चालक फिरोज पठाण, असे रात्रग्रस्त करत असताना, माळी वेस चौक या ठिकाणी एक पांढऱ्या रंगाची स्कार्पिओ नंबर एम एच १७ लश ५००७ ही संशयितरित्या उभी असताना दिसून आल्याने, गाडी मध्ये बसलेले इसमाची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव संजय पांडुरंग बहिर वय २७ वर्ष राहणार नवघन राजुरी तालुका जिल्हा बीड असे सांगितले, तो त्या ठिकाणी का थांबला त्याबाबत त्याला विचारणा केली असता त्यांनी उडवडीची उत्तरे दिल्याने संशय येऊन पोलीस उपनिरीक्षक नेवरे व त्यांच्यासोबत असलेल्या पोलीस अंमलदार इलियास शेख अफसर बागवान यांनी गाडीची तपासणी केल्या असता त्यांना गाडीच्या मधल्या शीटखाली एक लोखंडी पाती असलेले धारदार घातक कोयता मिळून आला.

पोलिसांनी लगेच सदर संशय ति आरोपीस ताब्यात घेऊन बीड शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून सदर आरोपीला अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून एक लोखंडी धातूचा धारदार घातक कोयता व एक पांढरा रंगाची स्कार्पिओ जप्त करण्यात आली आहे .पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता. त्याच्यावर यापूर्वी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन पिंपळनेर पोलीस स्टेशन शिवाजी नगर पोलीस स्टेशन या ठिकाणी त्याच्यावर खून करणे, कुणाचा प्रयत्न करणे, रात्रीची घर थोडी करणे, चोरी करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, पोलीस निरीक्षक बल्लाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे,

पान १ वरून...

पोलीस अमलदार इलियास शेख, अफसर बागवान, चालक फिरोज पठाण यांनी केली आहे पुढील तपास पोलीस हवालदार बबन जाधव हे करत आहेत.

**तळणीत नागरी....**

नागरिकांच्या जीवाशी उघडपणे खेळ असल्याचे चित्र आहे. लहानशी ठिणगी, उष्णता किंवा निष्काळजीपणामुळे मोठी दुर्घटना घडू शकते, याची जाणीव असूनही महसूल, पोलीस व संबंधित विभागाकडून ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अपघात घडल्यानंतरच प्रशासन हालचाल करणार का? असा संतप्त सवालही उपस्थित होत आहे. दरम्यान, या घराची पोलिसांकडून तपासणी करण्यात आल्याने नागरिकांमधील संशय अधिक बळावला आहे. तपासणीत स्फोटक साहित्य, जिलेटिन कांड्या तसेच ईडी व बाचक्यांचा साठा आढळून आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.मात्र, या प्रकरणी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे सांगण्यात येत आहे.

या प्रकरणाची माहिती खबरीकडून पोलिसांना देण्यात आल्यानंतर ११ जानेवारी रोजी मंठा पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक संतोष माळगे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी केली. मात्र, तपासणीत कोणताही स्फोटक साठा आढळून आला नसल्याचा खुलासा त्यांनी केला आहे.

एकीकडे संशयास्पद स्फोटक साठ्याबाबत चर्चा सुरू असताना, दुसरीकडे प्रशासनाकडून स्पष्ट आणि ठोस भूमिका मांडली जात नसल्याने नागरिकांमधील अस्वस्थता वाढत आहे.या संपूर्ण प्रकरणाकडे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालावे, स्वतंत्र तपास करावा आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आजच कठोर निर्णय घेणे गरजेचे असताना प्रशासनाची उदासीनता जनतेच्या रोषाला कारणीभूत ठरत आहे.

**चोर नेकनूर पोलीस ....**

सुगीचे दिवस आले आहेत. जी स्थिती नेकनुर ची तीच चौसाळा बाजार ची. विशेष म्हणजे अशा तक्रारी घेऊन कागद काळे करायला पोलिसांना वेळ नाही. एखादी मोठी घटना चोरीची अथवा अन्य गुन्ह्यांची घडलीच तर नेकनूर पोलीस ठाण्याला तक्रार द्यायची. पुन्हा दखल घेतली नाही म्हणून पोलीस अधीक्षक कार्यालयाचे उंबरे झिजवावे लागत आहेत. धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सयाजी शिंदेंचा डाळिंबाचा बाग चोरीला गेला. त्याकरता तक्रारदाराला एसपींची भेट घ्यावी लागली. एस पीं नी गुन्हे दाखल करा असे आदेश देण्या ऐवजी विनंतीच्या सुरात चंद्रकांत गोसावींना घ्या तक्रार असं सांगितलं. त्यानंतरही तक्रारीची दखल घेतली नव्हती. माध्यमांनी बोंब ठोकली त्यावेळी कसातरी गुन्हा नोंद केला. तीच स्थिती जोगवा मागून खाणाऱ्या घारगावच्या अंजना बन यांची झाली. देवळात झोपायचं नाही म्हणून एकाने मारहाण केली नाकातली मोरणी चोरली.आजींनी रीतसर तक्रार दिली. एसपींना आत्मदहनाचा इशारा दिला. तरीही दखल घेतली गेली नाही. शेवटी या प्रकरणात देखील माध्यमांना ओरड करण्याची वेळ आली. ओरड होताच तात्काळ कारवाई झाली. आजीला न्याय मिळाला. नेकनूर बस स्थानक, बँक, शिक्षक कॉलनीत चोरीच्या अनेक घटना घडल्या. या प्रकरणांमध्ये देखील काहीच झालं नाही. अनेक शेतकऱ्यांचा दारात ठेवलेला सोयाबीन सारखा माल चोरांनी रात्रीच भरून नेला. त्यातही तक्रार देऊनही पुढे काहीच झालं नाही. पोलिसांना चोर सापडलेच नाही. सापडतील कसे तपास झालाच नाही. ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावींना तो करावासा वाटला नाही. आपण तर एसपी चे लाडके म्हणून खाकी वर्दीची इज्जत त्यांनी ठेवली नाही. पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी तक्रारदाराने ठाण्याला येण्याची गरज नाही. क्यू आर कोड स्कॅन करा तक्रार दाखल करा असा आधुनिकतेचा मंत्र जनतेला दिला. याचाही ढोल नगारा माध्यमांनी जोरात वाजवला. पण जिथे प्रत्यक्षात तक्रार देऊन काही होत नाही. तिथे क्यू आर कोड ची दखल कोण घेणार? असा प्रश्न जनतेला का पडू नये अशी स्थिती सध्याची तरी आहे.

पान १ वरून...

नेकनूर पोलीस आठवडी बाजारात येणाऱ्या वाहनांना अडवून निधी संकलन करतात. चौसाळ्यात तर खास नेकनूर मधून माणूस रिक्षावाल्यांकडून वसुली करण्यासाठी पाठवला जातो.बाजारात चोर चुपचाप खिसे कापून, महिलांचे दागिने लंपास करून, मोबाईल चोरून पोलिसांच्या नाकावर टिच्चून निघून जातात. वसुली पुढे पोलिसांना होणाऱ्या चोऱ्यांशी काहीच देणे घेणे नाही. तक्रार घेऊन एखादा ठाण्यात आलाच तर दाप दडप करून कसा पिटाळून लावायचा त्याचीच उलट तपासणी कशी घ्यायची यामध्ये नेकनूर पोलिसांचा हात कोणीच धरू शकणार नाही अशी स्थिती आहे. आज नेकनूरच्या आठवडी बाजारात पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर बबन पांडुरंग कानडे नावाच्या सराफा व्यापाऱ्याची ३५ लाख रुपये किमतीची १५ किलो चांदी असलेली पेटी चोरांनी पळवली. नुसती पेटीच पळवली नाही तर ५० हजार रुपयांची रोकड देखील लंपास केली. संक्रांतीचा बाजार असल्यामुळे व्यापाऱ्यावर देखील सकाळी दहाच्या सुमारास चोरांची संक्रांत आली. चोरांचा दुपारपर्यंत शोध सुरू होता. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या प्रकरणात तरी पोलीस अधीक्षक सराफा व्यापाऱ्याला न्याय देऊ शकतील का? चंद्रकांत गोसावींच्या कारभाराला आळा घालू शकतील का? गोसावी लाडके आहेत म्हणून पुन्हा त्यांना पाठीशी घातलं जाणार का? यासारखे अनेक प्रश्न विचारले जात आहेत.

**पारधी वस्तीवरील शाळेत ....**

अंतर्गत लोणी फाटा येथील पारधी वस्तीवरील जिल्हा परिषद शाळेचे भयाण वास्तव समोर आले आहे.

या शाळेत शिकणाऱ्या चिमुकल्यांना शिकण्यासाठी साधा फळाही उपलब्ध नाही. भिंतीवर खडूने मुळाक्षरे लिहून शिक्षण दिले जात आहे. मुलांना बसण्यासाठी बाक नाहीत, फरशी नाही; खडी, माती आणि धुळीने भरलेल्या जमिनीवर शेतीमालाचे फाटके चवाळे अंथरून बसण्याची वेळ या मुलांवर आली आहे.

पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छतागृह यांसारख्या मुलभूत सुविधांचा पूर्ण अभाव असताना डिजिटल शिक्षण हा शब्द तरी प्रशासनाने उच्चारावा का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

**मार्च महिन्यात ....**

यासह पत्रकार संघाचे राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय प्रमुख पदाधिकारी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांमधील कर्तबगार व्यक्तिमत्त्वांना आणि त्याचबरोबर मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एक कर्तबगार व्यक्तिमत्व आणि एका कर्तबगार व्यक्तिमत्व असलेल्या पत्रकारांना या राज्यस्तरीय मेळाव्यामध्ये मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तिमत्त्वांनी आपल्या संपूर्ण सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील माहिती फोटोसहीत व्हाट्सअप नंबर ७० ३० १४ ९३ २२ यावर पाठवून पुरस्कारासाठी संपर्क साधावा असे आवाहन मिळाव्याचे आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला बीड जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांनी केले आहे.

विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांनी संपर्क साधावा

बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या कर्तबगार महिलांना या राज्यव्यापी मेळाव्यामध्ये गौरांकित करण्यात येणार आहे. यासाठी विविध क्षेत्रातील यशस्वी झालेल्या महिलांनी आपल्या संपूर्ण माहितीसह ७० ३० १४ ९३ २२ या व्हाट्सअप नंबर वर पुरस्कारासाठी माहिती पाठवावी असे आवाहन पत्रकार संघाच्या महिला बीड जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांनी केले आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती



# माजी सैनिक किसान एकता शिखर संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी माजी सैनिक विलास डापकर यांची निवड

दिंद्रुड ।प्रतिनिधी

पुणे येथे पार पडलेल्या माजी सैनिक किसान एकता शिखर संघाच्या बैठकीत बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड रविवारी करण्यात आली, यावेळी बीड जिल्हाध्यक्ष पदाची धुरा माजी सैनिक विलास अश्रुबा डापकर यांच्यावर सोपवण्यात आली आहे .

देशसेवा केलेल्या सैनिकांच्या सेवानिवृत्तीनंतर माजी सैनिकांच्या अनेक अडीअडचणी सोडवण्यासाठी माजी सैनिक किसान एकता शिखर संघाची स्थापना नुकतीच पुणे येथे करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील संगम येथील माजी सैनिक विलास डापकर हे सक्रिय व्यक्तिमत्व असून माजी सैनिकांच्या अनेक बाबींसाठी विलास डापकर भविष्यात किसान एकता शिखर संघाच्या माध्यमातून कार्य करणार आहेत.पुणे येथे आयोजित किसान एकता शिखर संघाच्या बैठकीचे अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर लोकसेवा आयोग महाराष्ट्र राज्य माजी अध्यक्ष यांच्या हस्ते विलास डापकर यांना नियुक्तीपत्र

देऊन सन्मानपूर्वक ही निवड करण्यात आली. या बैठकीत बीड उपजिल्हा अध्यक्षपदी माजी सैनिक दत्तात्रेय मधुकर बडे,संघटक पदी माजी सैनिक महादेव अश्रूबा कांदे यांची निवड याप्रसंगी करण्यात आली असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे माजी सैनिक वर्गातून अभिनंदन होत आहे.

# महाजनवाडी - बीड ते अयोध्याधाम
# श्रीरामनाम रथयात्रा सोहळाचे प्रस्थान

## भाजपा जिल्हा कार्यालयात भव्य स्वागत



बीड ।प्रतिनिधी

लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक आघाडीचे जिल्हा संयोजक, श्रीराम भक्त विष्णुदासजी महाराज सुरवसे यांच्या संकल्पनेतून,श्रीरामनवमी निमित्त व देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांना दीर्घ आयुष्य लाभण्यासाठी महाजनवाडी - बीड ते श्री. क्षेत्र अयोध्याधाम नमो श्रीरामनाम रथयात्रा सोहळाचे बीड येथून प्रस्थान झाले.

भाजपा जिल्हा कार्यालयात जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ड. सर्जेराव तांदळे, मा. नवनाथ अण्णा शिराळे यांच्या उपस्थितीत या रथयात्रेचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी मीराताई गांधले, रामदास बडे, सुंदर चव्हाण, मनोज काका पाटील, भूषण पवार, प्रमोद रामदासी, संग्राम बांगर, प्रमोद पुसरेकर, प्रीतताई कुकडेजा, कृष्णा तिडके, महादेव नागरगोजे, मनोज काका बांडे, घोलप मामा, भालचंद्र कुलकर्णी, राजेश चरखा यांच्यासह पदाधिकारी व श्रीराम भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा रथयात्रा सोहळा महाजनवाडी - बीड - पैठण - छत्रपती संभाजीनगर - श्रीक्षेत्र घृष्णेश्वर - बुलढाणा - श्री क्षेत्र शेगाव - अकोला- अमरावती- नागपूर- रामटेक - जबलपूर- मैहर- चित्रकूट - श्रीक्षेत्र प्रयाग्रज - श्रीक्षेत्र वाराणसी - श्रीक्षेत्र काशी - आणि अयोध्याधाम असा प्रवासाचा मार्ग असणार आहे. हा प्रवास ७५ दिवस असून २००० की. मीटरचा आहे.

# मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेची 'सुवर्ण' भरारी;
## सोलार ॲग्रो पॉवर कंपनीला राष्ट्रीय पुरस्कार

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यातील ४५ लाखांवर शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याचे स्वप्न पुर्णत्वास नेणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेडला नवी दिल्ली येथे शनिवारी (दि. १०) स्कोच समूहाच्या वतीने राष्ट्रीय सुवर्ण पुरस्काराने गौरविण्यात आले.



राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांच्या नेतृत्वात एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड अंतर्गत मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनीही या योजनेला मोठा गती दिली आहे. या दोहोंच्या नेतृत्वात गेल्या सव्वा वर्षांत ३३०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प या योजनेतून कार्यान्वित झाले असून त्याद्वारे राज्यातील ४० लाख एकर शेतजमिनीवर सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे.

देशाच्या विकासामध्ये योगदान देणाऱ्या विविध सार्वजनिक क्षेत्रातील योजना व संस्थांना दिला जाणारा स्कोच समूहाचा पुरस्कार हा राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र सन्मान आहे. पुरस्कारासाठी ऊर्जा वर्गवारीमध्ये मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या कामगिरीचे विविध तज्ज्ञांकडून मूल्यमापन करण्यात आले. शेतकरी लाभार्थ्यांचे अभिप्राय घेण्यात आले. यासह तज्ज्ञांच्या मतदानाद्वारे देशात प्रथम ठरलेल्या या योजनेला स्कोच सुवर्ण पुरस्कार जाहीर करण्यात आला. एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेडचे कार्यकारी संचालक श्री. श्रीकांत जलतारे व अधीक्षक अभियंता श्री. निखिल मेश्राम यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. या योजनेमुळे महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत. या योजनेत आतापर्यंत ३३०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे ८ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० साठी एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेडला नवी दिल्ली येथे राष्ट्रीय सुवर्ण पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यकारी संचालक श्री. श्रीकांत जलतारे, अधीक्षक अभियंता श्री. निखिल मेश्राम यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

# अहिल्यानगर येथे ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२६ राज्यस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा

## स्पर्धेकरिता लाईफ स्टाईल जीम बीड येथे १८ जानेवारी रोजी होणार चाचणी स्पर्धा

बीड ।प्रतिनिधी

आय बी बी एफ महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन. मुंबई यांचे मान्यतेने व अहिल्या नगर असोसिएशन ऑफ बॉडी बिल्डिंग अँड फिजीक स्पोर्ट्स यांच्या विदयमाने ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२६ व ( मास्टर्स / दिव्यांग )आणि ज्युनिअर महाराष्ट्र श्री स्पर्धेचे आयोजन शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विठठला लान्स राहुरी जिल्हा अहिल्या नगर येथे करण्यात आलेले आहे.



या स्पर्धेकरिता बीड जिल्हा ज्युनियर, मास्टर्स, दिव्यांग शरीर सौष्ठव चाचणी स्पर्धेचे आयोजन रविवार १८ जानेवारी रोजी सायः ६:३० वाजता मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशन व बीड जिल्हा असोसिएशन, लाईफ हेल्थ क्लब लाईफ स्टाईल जिम महात्मा फुले शॉपिंग सेंटर,नवी भाजी मंडई बीड येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी जिल्ह्यातील इच्छुक स्पर्धकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे ,कार्य अध्यक्ष आमदार विजयसिंह पंडित ( राजे ) , सचिव डॉ.सय्यद अरशियान उल्लाह मिसबाह उल्लाह, डॉ. सय्यद मसीह, ड.शेख शफीक भाऊ, श्री.अविनाश नाईकवाडे, श्री.विक्रांत हजारे , गोरख कैवाडे , सय्यद सिराज सर ( परळी ), जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशन चे सचिव सय्यद अमान उल्लाह यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क करा जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशन सचिव सय्यद अमान उल्लाह लाईफ जिम बीड यांच्याशी ८१४९७७७९७ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# युगपुरुष स्वामी विवेकानंद यांनी युवकांच्या मनात नवचैतन्याची ज्योत प्रज्वलित केली
## तर राजमाता जिजाऊंनी एका राजयुगाला जन्म दिला - प्रा. डॉ. नामदेव सानप

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

युगपुरुष स्वामी विवेकानंद यांनी जगात राष्ट्रधर्म ,संस्कृती व अध्यात्माचा प्रचार प्रसार केला. आपल्या प्रेरणादायी तत्त्वज्ञानाचा ठसा जगभर उमटविला. 'जागे व्हा आणि ध्येय गाठा' या त्यांच्या मंत्रामुळे युवकातील शक्ती जागृत झाली. स्वामींच्या विचारांमुळे व तत्वज्ञानामुळे युवकात नवचैतन्याची ज्योत प्रज्वलित झाली तर राजमाता जिजाऊ यांनी एका राजयुगाला जन्म दिला. असे मत प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले.छत्रपती संभाजी नगर येथील मॉडर्न महाविद्यालयात युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त युवा दिन व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी प्राचार्य डॉ. सानप हे बोलत होते. याप्रसंगी पुढे बोलताना डॉ. सानप म्हणाले की, स्वामी विवेकानंद यांनी जगभर राष्ट्रधर्म, संस्कृती व अध्यात्माचा प्रचार प्रसार केला स्वामींच्या व्यक्तिमत्त्वात राष्ट्रधर्म, संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचा त्रिवेणी संगम होता. संवाद, ध्येय,



आत्मविश्वास, प्रयत्न, आत्मचिंतन, ध्यान, अध्यात्म आणि जागृतीच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला . वर्तमान युगातही स्वामींचे तत्त्वज्ञान मानवी उत्कर्षासाठी आवश्यक आहे. राजमाता जिजाऊ यांनी एका राज युगाला जन्म दिला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व्यक्तिमत्त्वावर आदर्श राज सत्तेच्या शासन व प्रशासनाचे संस्कार केले व आदर्श राजा घडविला ज्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रल्हाद तारू उपस्थित होते. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी म्हटले की, युवकांनी स्वामी विवेकानंदांचे विचार व तत्वज्ञान आत्मसात करण्याची गरज आहे.

प्रारंभी युगपुरुष स्वामी विवेकानंद आणि राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन प्रा .ज्योती मोरे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. हर्षद वाघमारे प्रा. उत्कर्षा इंगोले प्रा. नबिहा खान, श्री. पवन मस्के आदी कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्य उपस्थित होते.

# जिजाऊ-दोन छत्रपती घडविणारी राष्ट्रमाता-प्रा.डॉ. कार्तिक गावंडे

## जिजाऊ जयंतीनिमित्त महाविद्यालयात विचारप्रवर्तक कार्यक्रम



जालना ।प्रतिनिधी

भारताच्या इतिहासात अनेक महान स्त्रियांनी आपला ठसा उमटवला असला तरी राजमाता जिजाऊ या केवळ एका कुटुंबाच्या माता नव्हत्या तर संपूर्ण राष्ट्राच्या घडणीत निर्णायक भूमिका बजावणाऱ्या राष्ट्रमाता होत्या, असे ठाम प्रतिपादन इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.कार्तिक गावंडे यांनी केले. महाविद्यालयात आयोजित राजमाता जिजाऊ जयंती कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस होते.यावेळी डॉ.गावंडे यांनी आपल्या ओघवत्या व अभ्यासपूर्ण भाषणातून जिजाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल वेध घेतला.डॉ.गावंडे म्हणाले ज्या स्त्रीने एक नव्हे तर दोन छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज घडवले त्या जिजाऊंचे योगदान अतुलनीय आहे.त्यांनी शिवाजी महाराजांच्या बालमनावर स्वराज्याचे बीज रोवले. रामायण महाभारत संतपरंपरा,धर्मनीती, स्वाभिमान आणि कर्तव्यभावना या मूल्यांचे संस्कार त्यांनी लहानपणीच दिले.याच संस्कारांतून शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धा नव्हे तर लोककल्याणकारी व न्यायप्रिय राजा म्हणून घडले.तसेच संभाजी महाराज हे पराक्रमी, विद्वान आणि स्वाभिमानी राष्ट्ररक्षक बनले हेही जिजाऊंच्याच संस्कारांचे फलित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिजाऊंची विचारसरणी केवळ धार्मिक नव्हे तर वैज्ञानिक, विवेकी आणि प्रगत होती. अंधश्रद्धा,रूढी-परंपरा व कर्मकांडांनी ग्रासलेल्या समाजात त्यांनी कधीही विवेकाचा मार्ग सोडला नाही.देवभक्ती करतानाही त्यांनी अंधश्रद्धेला थारा दिला नाही. माणुसकी, कर्तव्य आणि विवेक यांनाच त्यांनी सर्वोच्च स्थान दिले असे त्यांनी नमूद केले.

त्या काळातील अमानवी सतीप्रथेचा त्यांनी ठाम नकार दिला.पती निधनानंतरही त्यांनी जीवन संपवले नाही तर राष्ट्रनिर्मितीचे कार्य अधिक जोमाने हाती घेतले.ही कृती स्त्री म्हणजे परावलंबी नव्हे तर समाज घडवणारी शक्ती आहे, असा क्रांतिकारी संदेश देणारी होती असे डॉ.गावंडे यांनी अधोरेखित केले.जिजाऊंनी स्त्रीचे स्थान केवळ घरापुरते मर्यादित न ठेवता इतिहासात उंचावले.त्या स्वाभिमानी,धैर्यवान,दूरदर्शी आणि कर्तव्यनिष्ठ होत्या.त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून स्त्रीशक्तीचा खरा अर्थ उमगतो-शांततेतून संस्कार आणि संकटात धैर्य ठेवून कार्य करण्याचे बळ असे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस यांनी राजमाता जिजाऊंच्या अतुलनीय कार्याचा गौरव करत, आजच्या मूल्यसंक्रमणाच्या काळात जिजाऊंचा विचार अधिकच महत्त्वाचा ठरत असल्याचे सांगितले. स्वाभिमान, विज्ञाननिष्ठा,स्त्रीसन्मान आणि राष्ट्रभक्तीचा मार्गच जिजाऊंनी समाजाला दिला,असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.संजय पाटील, पांडुरंग खोजे,पर्यवेक्षक रामप्रसाद भालेकर,अधिक्षक सुरेश चव्हाण,राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.मसूद अन्सारी,प्रा. रामनाथ सांगोळे,प्रा.कांचन मुळे, डॉ.संजय गायकवाड,डॉ. ज्ञानेश्वर कळकटे,डॉ.मकरंद चोबे,डॉ. कृष्णा कदम,प्रा.चंद्रकांत लाटेकर,श्री वसंत हिवाळे,श्री विठ्ठल पवार,श्री रघुनाथ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा.डॉ.मसूद अन्सारी यांनी केले. एकूणच हा कार्यक्रम राजमाता जिजाऊ यांच्या राष्ट्रघडणीतील योगदानाचे दर्शन घडवणारा आणि उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.


## कार्यालय नगरपंचायत तीर्थपुरी ता.घनसावंगी जि.जालना

**जा.क्र.२०२५/नपती/जा.प्र./ना.वी/कावी-३०**

### जाहीर प्रकरण

सर्व जनतेस या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की,अर्जदार: ज्योती दादाराव पालोदे रा. टाकळी हिवर्डी ता. भोकरदन जि.जालना यांनी गट नं.(-) सिटी सर्व्हे नं.(-) ग्रा.पं.कालिन नगरपंचायत मिळकत क्रं.२७९५ क्षेत्र ५२८ चौ.फु.जागा नामे बद्रीनाथ संदिपान उढाण रा.पिठोरे सिरसगांव ता.अंबड जि.जालना यांच्याकडून रजिस्टर खरेदी खत दस्त क्र.६९२६/२०२५ दि.२४/१२/२०२५ अन्वये खरेदी केली आहे.खरेदी खत सत्य प्रत जोडून आवक क्र.(०४) दि.०१/०१/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा बद्रीनाथ संदिपान उढाण रा.पिठोरे सिरसगाव ता.अंबड जि.जालना यांच्या नावावर असलेले गट नं.(-) सिटी सर्व्हे नं.(-) ग्रा.प.कालिन नगरपंचायत मिळकत क्र.२७९५ क्षेत्र ५२८ चौ.फु. म्हणजेच ४९.०५ चौ.मी. ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- विठ्ठल शेळके यांची जागा
पश्चिम :- रस्ता
दक्षिण :- दिगंबर बोबडे यांची जागा
उत्तर :- रस्ता

वरील चतु:सिमा मधील क्षेत्र ४९.०५ चौ.मी. जागा खरेदी खत पत्र आधारे नामांतर करणेबाबत

काही/उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत या कारलयात लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुददत संपल्यावर नामांतर साठी कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कारवाई पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत. तीर्थपुरी**



## तहसील कार्यालय, कळंब

**जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावि-**
**दि.१०.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी **खामसवाडी ता कळंब जि. धाराशिव** यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खामसवाडी** यांचेमार्फत **श्री अतिक फारूख काझी रा.शिराढोण ता कळंब जि. धाराशिव** यांनी **त्यांचा स्वत:चे** यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव **मौजे खामसवाडी ता. कळंब** हे असून सदर व्यक्तीचा **मौजे खामसवाडी ता कळंब जि. धाराशिव** या ठिकाणी **दि. ०३/०६/१९७२** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खामसवाडी यांनी दि. ०३/१२/२०२५ रोजी** आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**


# समाजसेवेचा चेहरा नेतृत्वाची ताकद अँड. सौ.कांचनमालाताई उत्कर्ष संगवे

शिराढोण । बिलाल कुरेशी

यशस्वी व प्रसिद्ध उद्योजिका आणि समाजसेवेसाठी परिसरात ओळखल्या जाणाऱ्या अँड.सौ कांचनमालाताई उत्कर्ष संगवे या आज शिराढोण परिसरातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे येत आहेत. कायदा, उद्योग आणि सामाजिक बांधिलकी या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

कोरोना काळात संपूर्ण समाज संकटात असताना, कांचनमाला संगवे यांनी सेवाच धर्म मानून हॉस्पिटल मध्ये असलेल्या गरजू नागरिकांसाठी टिफिन सेवा सुरू केली. उपाशीपोटी कोणीही राहू नये, या भावनेतून त्यांनी केलेल्या कार्याला समाजातून मोठा प्रतिसाद मिळाला. या उल्लेखनीय सेवेसाठी त्यांना 'अन्नपूर्णा पुरस्कार' सहित अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.उद्योग क्षेत्रात यशस्वी वाटचाल करताना त्यांनी महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपक्रम राबवले. कायद्याचे सखोल ज्ञान, ठाम भूमिका आणि माणुसकीचा दृष्टिकोन यामुळे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आपले स्थान निर्माण केले आहे.



आता शिराढोण जिल्हा परिषद निवडणुकीसाठी त्या एक उबाटा शिवसेना च्या तगडा उमेदवार म्हणून चर्चेत आहेत. त्यांच्या उमेदवारीला समाजातील विविध स्तरांतून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून त्यांनी मागील वेळेस जिल्हा परिषद सदस्य असताना केलेल्या कार्याचा उल्लेख आज बी गावोगावी चर्चेत येत आहे. त्यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.समाजसेवा, सक्षम नेतृत्व आणि विकासाची स्पष्ट दृष्टी असलेल्या अँड. सौ कांचनमालाताई संगवे यांचा हा राजकीय प्रवास शिराढोणच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# सौ.सुनंदा राजेंद्र जगताप यांचे दु:खद निधन

बीड /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मुर्शदपूर येथील मूळ रहिवासी व सध्या शिवाजी विद्यालया जवळील त्वरिता कॉलनी येथे वास्तव्यास असलेल्या सौ. सुनंदा राजेंद्र जगताप (वय ६८) यांचे आज पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. त्या श्री राजेंद्र संतराम जगताप यांच्या पत्नी तसेच श्री प्रवीण राजेंद्र जगताप यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्वरिता देवी कॉलनी व मुर्शदपूर परिसरात शोककळा पसरली.

सौ. सुनंदा जगताप या अतिशय शांत, संयमी व धार्मिक वृत्तीच्या होत्या. साधू-संतांच्या विचारांचा त्यांच्या जीवनावर मोठा प्रभाव होता. सामाजिक व धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सकारात्मक सहभाग राहिला. त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता मुर्शदपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी बीड आणि मुर्शिदपूर व परिसरातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेते कार्यकर्ते यांच्यासह डॉक्टर, इंजिनीयर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालन्यात एसीबीचा दणका ७ हजारांची लाच मागणाऱ्या ग्रामसेवकावर भरदिवसा झडप




जालना ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.जिल्हा परिषद जालना अंतर्गत कार्यरत असलेल्या एका लाचखोर ग्रामसेवकाला २ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने - उइ रंगेहाथ पकडले. सोमवारी १२ जानेवारी रोजी करण्यात आलेल्या या धडाकेबाज कारवाईमुळे शासकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे.

तक्रारदाराच्या एका प्रलंबित कामासाठी संबंधित ग्रामसेवकाने अडवणूक केली होती. हे काम करून देण्यासाठी त्याने सुरुवातीला ७ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. मात्र तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट जालना एसीबीकडे धाव घेतली.

असा रचला सापळा

तक्रार प्राप्त होताच एसीबी पथकाने तातडीने हालचाली करत सापळा रचला. दरम्यान तडजोडीअंती लाचेचा आकडा २ हजार रुपयांवर निश्चित झाला. सोमवारी दुपारी ठरल्याप्रमाणे जेव्हा आरोपीने लाचेची रक्कम स्वीकारली त्याचवेळी दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ झडप घालून ताब्यात घेतले.आरोपी ग्रामसेवक/वर्ग सहाय्यक जिल्हा

(उर्वरीत पान २ वर)

# अंकुशनगर बीड येथील खून प्रकारणातील आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखा व शिवाजीनगर पोलीस स्टेशनची संयुक्त कारवाई



बीड ।प्रतिनिधी

बीड येथील अंकुशनगर भागात दिनांक ०६/०१/२०२६ रोजी हर्षद तुळशीराम शिंदे हा पाईपलाईन दुरुस्तीच्या कामाचा खड्डा खोदत असताना त्याठिकाणी विशाल संजय सूर्यवंशी रा. कालिकानगर, अंकुशनगर, बीड येऊन त्याचेकडील पिस्टलने हर्षद तुळशीराम शिंदे यांचेवर गोळ्या झाडून व धारदार शस्त्राने वार करून खून केला होता. त्यावरून पोलीस स्टेशन शिवाजीनगर बीड येथे गुरनं १०/२०२६ कलम १०३ बीएनएस सह कलम ३/२५,४/२५ भा.ह. का अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

सदर गुन्ह्यातील फरार आरोपी विशाल सुर्यवंशी याचा शोध घेण्याकरिता मा. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक बीड यांनी वेगवेगळे पथक तयार करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा व पो.स्टे. शिवाजीनगर बीड यांना आदेशित केले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे दोन व शिवाजीनगर बीड यांचे एक पथक आरोपी शोध घेत होते. त्यामध्ये सदर पथकाने उउढत फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपीचा शोध घेत असताना आज रोजी गोपनीय बातमीदारा व्दारे माहिती मिळाली

(उर्वरीत पान २ वर)

# धडाडीचे समाजसेवक रहेमान सय्यद यांना

## दै. अल्हिलाल समूहाचा नजाबत अली उस्मानी आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार जाहीर



आष्टी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील एकमेव उर्दू दैनिक अल्हिलाल टाइम्स यांनी उर्दू वर्तमानपत्रासह मराठी दैनिक संघर्ष सुरू करून उर्दू दैनिकाचा भक्कम समूह उभा करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. गेल्या १८ वर्षांची उज्वल परंपरा कायम ठेवत, १९ व्या वर्षातही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, येत्या ३१ जानेवारी २०२६ रोजी भव्य पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.

या सोहळ्यात बीड येथील नामवंत शिक्षक, समाजसेवक व उर्दू भाषेचे अभ्यासक नजाबत अली उस्मानी यांच्या नावाने दिला जाणारा आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार आष्टी तालुक्यातील कडा येथील धडाडीचे समाजसेवक व पत्रकार रहेमान सय्यद यांना जाहीर करण्यात आला आहे.

कडा येथील रहिवासी असलेले रहेमान सय्यद हे सामाजिक कार्यासोबतच पत्रकारिता क्षेत्रातही अग्रेसर आहेत. तालुक्यातील रुग्ण, गरजू व गोरगरीब नागरिकांच्या सेवेत ते नेहमीच तत्पर असतात. पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक गंभीर प्रकरणांना वाचा फोडून त्यांनी अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून दिला आहे.

गोरगरीब नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, मतदार यादीत नोंदणी करणे, सामाजिक प्रश्नांवर आंदोलने व उपोषणे करणे, तसेच लेखणीद्वारे अन्यायाविरोधात ठामपणे आवाज उठवणे अशी अनेक समाजोपयोगी कामे त्यांनी केली आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत दै. अल्हिलाल समूहाच्या वतीने त्यांना नजाबत अली उस्मानी आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा झाल्यानंतर रहेमान सय्यद यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# चौसाळा ग्रामपंचायत मध्ये राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी




चौसाळा शहराच्या सरपंचांना जयंती चा पुन्हा विसर

चौसाळा ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा ग्रामपंचायत मध्ये राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमतः राष्ट्रमाता राजमाता मासाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस चौसाळा ग्रामपंचायतचे उपसरपंच अंकुश अण्णा कळासे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले यावेळी चौसाळा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब चव्हाण, लिपिक श्रीमती भोसले मॅडम, लिपिक प्रदीप पवार, पाणीपुरवठा कर्मचारी मनोज वाघमारे, कमुनाना नाईकवाडे इत्यादी उपस्थित होते.

# शाम विद्यालय दहिफळ वडमाऊली येथे आनंदनगरी मोठ्या उत्साहात संपन्न

बीड ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील शाम विद्यालयात प्राचार्या सौ जयश्री शरद गदळे यांच्या हस्ते आनंदनगरीचे उद्घाटन करण्यात आले. शाम विद्यालय एक शैक्षणिक दर्जा आहे.या विद्यालयात शैक्षणिक उपक्रमा बरोबर विविध सहशालेय उपक्रम राबविले जातात.त्यामध्ये क्रीडा, सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा त्यामध्ये वक्तृत्व चित्रकला रांगोळी निबंध लेखन या स्पर्धा बरोबरच यावर्षी प्रथमच संस्थेचे सचिव श्री शरद गदळे यांच्या कल्पनेनुसार आनंद नगरीचे आयोजन प्राचार्यांनी केले. जेणे करून विद्यार्थ्यांना सामाजिक ज्ञान, व्यवहार ज्ञान, नफा व तोटा यांची माहिती मिळेल सदरील




आनंदनगरी मध्ये विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्साह हा कल्पनेच्या बाहेरचा होता विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वलय दिसत होते हे पाहून सर्व शिक्षकांना ही समाधान वाटत होते. आपण आयोजित केलेल्या पहिल्याच आनंद नगरीच्या उपक्रमास एवढा प्रतिसाद मिळतोय याची कल्पनाही नव्हती अशा भावना शेवटी प्राचार्या सौ. गदळे मॅडम यांनी व्यक्त केल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाम विद्यालय शाम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले अशी माहिती प्रसार माध्यमांना प्रा. तात्यासाहेब डोईफोडे यांनी दिली आहे.




मुखेड - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आडलूर येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.(छाया मनोज बिरादार)




# मुलींच्या शासकीय वसतिगृहात रंगला गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमांचा सोहळा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी येथील मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींच्या शासकीय वसतिगृहात विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि सांस्कृतिक जाणीव वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या प्रतिसादात पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसतिगृहाच्या गृहपाल श्रीमती ए. डी. जाधव होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून आष्टी तहसीलचे नायब तहसीलदार श्री. भगीरथ धारक (शासन) उपस्थित होते. याशिवाय सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी रामदास तरटे, तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमात विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीते, लोकगीते, तसेच आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारी गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नृत्य, गायन व विविध सादरीकरणांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले. त्यांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांकडून प्रचंड टाळ्यांचा कडकडाट मिळाला.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थिनींनी आणि शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले होते. पालकवर्ग, शिक्षक आणि उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थिनींच्या कला-कौशल्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सांस्कृतिक जाणिवा अधिक बळकट होतात, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.याप्रसंगी वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनी, कर्मचारी तसेच बीव्हीजी कंपनीचे कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

## भगवानराव शिनगिरे यांना ‘लोकसंसद जन प्रेरणा शिखर सन्मान’ प्रदान

# ग्रामीण विकासाचे द्रष्टे नेतृत्व आणि समाजकार्याचा दीपस्तंभ - सुरेश यादव

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील वटनवाडी येथील मा. भगवानराव (दादा) शिनगिरे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व ग्रामविकास कार्याची दखल घेत ‘लोकसंसद जन प्रेरणा शिखर सन्मान’ प्रदान करण्यात आला. हा सन्मान माननीय सुरेश यादव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना सुरेश यादव यांनी भगवानराव शिनगिरे यांचे कौतुक करताना सांगितले की, ते केवळ एक यशस्वी सरपंच नसून ग्रामीण विकासाच्या संकल्पनेला कृतीत उतरवणारे द्रष्टे नेतृत्व आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उभे राहिलेले आदर्श गाव आज संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणास्थान ठरले आहे. भगवानराव शिनगिरे यांच्या नियोजनबद्ध, लोकाभिमुख व सर्वसमावेशक विकासदृष्टीची दखल घेऊन त्यांच्या गावाची माहिती दूरदर्शन वाहिनीवर प्रथमच प्रसारित झाली, ही बाब त्यांच्या कार्याची मोठी पावती आहे.

गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ ते सातत्याने समाजातील वंचित घटकांसाठी कार्यरत आहेत. विशेषतः अनुसूचित जाती, ऊसतोड कामगार कुटुंबे आणि शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी त्यांनी मोफत शिक्षण, निवास, मार्गदर्शन आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या या सेवाभावी कार्यामागे पद, प्रसिद्धी किंवा लाभाची अपेक्षा नसून सामाजिक न्याय व मानवी सन्मान हाच एकमेव उद्देश आहे.

विशेष बाब म्हणजे, शासनाकडून कोणतेही अनुदान न घेता एकही रुपया न स्वीकारता त्यांनी सुंदर, शिस्तबद्ध व प्रभावी प्रकल्प उभे केले, ते यशस्वीपणे राबवले आणि आजही तेच कार्य अखंडपणे सुरू आहे. यामुळे त्यांच्या स्वावलंबन, पारदर्शकता आणि उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्याची प्रचिती येते.

सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणूनही भगवानराव शिनगिरे ओळखले जातात. लोकसहभाग, सामूहिक निर्णय प्रक्रिया आणि दीर्घकालीन शाश्वतता या सहकार तत्त्वांचा त्यांनी गावविकासात प्रभावी वापर केला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील उपक्रम केवळ टिकाऊच नव्हे तर अनुकरणीय ठरत आहेत.

लोकसंसद जन प्रेरणा शिखर सन्मान हा त्यांच्या निःस्वार्थ सेवाभाव, आदर्श नेतृत्व आणि समाजघडविण्याच्या ध्यासाला दिलेली योग्य




पावती आहे. गाव घडवायचे असेल तर माणूस घडवावा या तत्त्वाचे ते जिवंत उदाहरण असून, त्यांचे कार्य नव्या पिढीला निश्चितच प्रेरणा देणारे आहे. - सुरेश यादव (अध्यक्ष, क्रांती ग्राम विकास संस्था, लोकसंसद बीड)

# आष्टीच्या शाहू महाराज मूकबधिर विद्यालयाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत पटकावले सांघिक विजेतेपद

आष्टी (प्रतिनिधी)

अंबाजोगाई येथे नुकत्याच पार पडलेल्या बीड जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा व कला स्पर्धेत आष्टी येथील शाहू महाराज निवासी मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत मूकबधिर प्रवर्गातून सांघिक विजेतेपद पटकावले आहे. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाची पाच, द्वितीय क्रमांकाची तीन व तृतीय क्रमांकाची एक अशी एकूण नऊ पारितोषिके मिळवून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, बीड व कै. सुमतीताई गुणाले मतिमंद विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत अंबाजोगाई येथे या जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, शिक्षणाधिकारी तथा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीम. प्रियाराणी पाटील, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अंकुश नखाते आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरणही श्रीम. प्रियाराणी पाटील व अंकुश नखाते साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धांमध्ये शाहू महाराज मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध वयोगटांत उत्कृष्ट कामगिरी केली. यामध्ये गायकवाड ओम गजानन (१७ ते २१ वयोगट) याने लांब उडी व गोळाफेक या दोन्ही स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. पोठरे राजेश दत्तात्रय (८ ते १२) याने लांब उडीत प्रथम, तर ५० मीटर धावण्यात द्वितीय क्रमांक मिळवला. कदम श्रीकांत आनंदराव (१२ ते १६) याने लांब उडीत प्रथम क्रमांक पटकावला. गोडगे रविकांत चंद्रकांत (१२ ते १६) याने गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. भिल्ल सखाराम जगन (१२ ते १६) याने २०० मीटर धावण्यात द्वितीय व ४०० मीटर धावण्यात तृतीय क्रमांक मिळवला. ननवरे निलेश ज्ञानेश्वर (८ ते १२) याने ५० मीटर धावण्यात द्वितीय क्रमांक पटकावला.



या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीम. प्रियाराणी पाटील, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अंकुश नखाते साहेब, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे, मुख्याध्यापक काकासाहेब थोरवे यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच या यशासाठी शाळेचे क्रीडा शिक्षक सुधीर तोडकर, कांबळे सर, श्रीम. आजबे मॅडम, मस्के सर यांनी घेतलेल्या परिश्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले.या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाहू महाराज मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या असून, भविष्यातही असेच यश मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

अंबड ।प्रतिनिधी

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी अंबड शहरातील विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त भव्य व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रनिर्मितीला दिशा देणाऱ्या या थोर विभूतींच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मा. श्री सुरेश शेठ भावले होते. प्रमुख पाहुणे म्हणून अंबड वार्ता चे संपादक व तैलिक महासभा जालना जिल्हाध्यक्ष मा. श्री बळीराम भाऊ राऊत, दैनिक अत्ताच एक्सप्रेस चे जालना जिल्हा



प्रतिनिधी मा. श्री गणेश सपकाळ सर, दैनिक समर्थ राजयोग चे जिल्हा प्रतिनिधी मा. श्री फारूक शेख सर, भारतीय लोकशाही न्यूज चे कार्यकारी संपादक मा. श्री आकाश जळके तसेच गुरुकुलचे संचालक मा. श्री संजय जाधव सर उपस्थित होते.

प्रारंभी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणातून राजमाता जिजाऊंच्या संस्कारशील मातृत्वाचा व स्वामी विवेकानंदांच्या तेजस्वी विचारांचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर होणारा सकारात्मक प्रभाव विशद केला. विद्यार्थ्यांनीही या विचारांतून प्रेरणा घेऊन देशसेवेसाठी सज्ज व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे शिक्षक योगेश हरणे सर यांनी केले. विद्यार्थी प्रशांत वाघ याने प्रभावी भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. जयंतीनिमित्त शाळेत स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात आले असून, या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्याची घोषणा अंबड वार्ता चे संपादक व तैलिक महासभा जिल्हाध्यक्ष मा. श्री बळीराम भाऊ राऊत यांनी केली.कार्यक्रमाचा समारोप गुरुकुलचे संचालक मा. श्री संजय जाधव सर यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. यावेळी श्री प्रमोद मस्के सर, श्री योगेश हरणे सर, सौ. शितल जाधव मॅम, सौ. योगिता शिंदे मॅम तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# पिंपरखेड बु. येथील अंगणवाडीत चिमुकल्यांकडून राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

घनसावंगी ।प्रतिनिधी

पिंपरखेड बु.येथील अंगणवाडीमध्ये राजमाता जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या वेळी अंगणवाडीतील चिमुकल्या बालकांनी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.कार्यक्रमात चिमुकल्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण विविध वेशभूषा व प्रभावी घोषवाक्यांच्या माध्यमातून राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्याची ओळख करून दिली.त्यांच्या संस्कारशील मातृत्वातून घडलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य, राष्ट्रप्रेम व धैर्य याबाबत अंगणवाडी सेविका व उपस्थित मान्यवरांनी सोप्या शब्दांत मार्गदर्शन केले.



या उपक्रमामुळे लहान वयातच मुलांमध्ये चांगले संस्कार इतिहासाची जाणीव व राष्ट्रभक्तीची भावना रुजत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.चिमुकल्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि आनंदी चेहऱ्यांमुळे संपूर्ण अंगणवाडी परिसर उत्साहाने भारावून गेला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका मदतनीस तसेच पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.राजमाता जिजाऊ यांच्या विचारांची पेरणी करणारा हा उपक्रम बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला.

# भगवान महाविद्यालयाचे विशेष हिवाळी शिबिर रुई नालकोल येथे उत्साहात संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

येथील भगवान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष हिवाळी शिबिर यावर्षी रुई नालकोल (ता. आष्टी) येथे पार पडले. सोमवार दि. ५ जानेवारी २०२६ ते रविवार दि. ११ जानेवारी २०२६ या कालावधीत हे शिबिर यशस्वीपणे पार पडले. शिबिराचे उद्घाटन दि. ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य व शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव अजय दादा धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली व गावच्या सरपंच संध्या श्रीपती नालकोल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बीड जिल्हा समन्वयक डॉ. रवी सातभाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद शाश्वत विकासासाठी युवकांची भूमिका असे होते. या ब्रीदाला अनुसरून शिबिरात विविध समाजोपयोगी व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये पुरामुळे दयनीय झालेल्या स्मशानभूमीची स्वच्छता, गावातील व ग्रामपंचायत परिसराची स्वच्छता, महेश विद्यालय परिसरातील बागेत बाबाजी पुतळ्याजवळ स्वच्छता, रुई गावच्या देवस्थान दावल मलिक परिसराची स्वच्छता करण्यात आली.

जनजागृतीसाठी शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा तसेच गावातील महिलांसाठी सुंदर





माझी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

समाजप्रबोधनासाठी अंधश्रद्धा निर्मूलन विषयावर कीर्तनकार ह. भ. प. निलम ताई गलांडे महाराज यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले. महेश विद्यालय येथे किशोरवयीन मुलींची आरोग्यतपासणी ग्रामीण रुग्णालय, आष्टी यांच्या सहकार्याने करण्यात आली. ही तपासणी प्रयोगशाळा तंत्रज्ञ जयचंद नेलवाडे यांच्या टीमने केली. तसेच बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती व जलसंधारणाचे महत्त्व विशद करणारे मार्गदर्शन शिबिरात देण्यात आले.

जलसंधारण उपक्रमांतर्गत नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांमध्ये वाहून आलेली झाडे व कचरा काढून शिबिरार्थींनी सफाई केली. त्यामुळे शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टळण्यास मदत झाली.या शिबिराचा समारोप रविवार दि. ११ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता पार पडला. समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य व आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते उपस्थित होते. सरपंचांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी मौजे रुई नालकोल हे गाव राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत पाच वर्षांसाठी दत्तक घेण्याची घोषणा केली. या घोषणेचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

शिबिरादरम्यान विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोमनाथ खाडे यांनी भेट देऊन कामाचा आढावा घेतला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, शाश्वत विकासासाठी युवकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकास हे ग्रामीण व शहरी दोन्ही भागांसाठी जीवनदायी घटक आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवक समाजातील समस्या ओळखून त्यावर कृतीशील उपाय करतात. त्यामुळे युवक हेच शाश्वत विकासाचे खरे शिल्पकार आहेत.

हे विशेष शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य व उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी प्रो. अशोक देवकर, प्रो. दिगंबर पाटील, प्रा. श्रीकांत धोंडे व डॉ. बाळासाहेब गावडे यांनी उत्कृष्ट नियोजन केले. त्यांना गावचे सरपंच तात्यासाहेब नालकोल, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटीचे चेअरमन पांडुरंग धोंडे, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती नामदेव धोंडे, ज्ञानदेव धोंडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# मंठा येथे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब जयंती उत्साहात साजरी

मंठा । प्रतिनिधी

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त मंठा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक (शिवतीर्थ) येथे मंगळवारी (दि. १२ जानेवारी २०२६) उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेस तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी दीपप्रज्वलन करण्यात आले असून संपूर्ण परिसर भगव्या ध्वजांनी सजविण्यात आला होता. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शिवभक्त, जिजाऊभक्त व नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर व नागरिकांनी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव केला. त्यांच्या संस्कारांतूनच छत्रपती शिवाजी महाराज घडले व स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली, असे मनोगत व्यक्त करण्यात आले. तसेच आजच्या तरुण पिढीने जिजाऊ माँसाहेबांच्या संस्कारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.संपूर्ण कार्यक्रम उत्साह, शिस्त व शिवभक्तीच्या वातावरणात शांततेत पार पडला.



# जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील कै. डॉ. भाऊसाहेब देशमुख विद्यालयात सोमवार दिनांक १२.०१.२०२६ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक मोरे बी एस यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून व श्रीफळ फोडून जयंती साजरी करण्यात आली. व तसेच शाळेचे प्रवेक्षक घोनसीकर सर यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विद्यार्थ्यांना जीवनकार्याची माहिती सांगितली. या कार्यक्रमास शाळेचे विद्यार्थी विद्यार्थिनी व सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

# शाळेच्या इयत्ता पहिली-दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी परभणी येथे हुरडा पार्टीची शैक्षणिक सहल

धर्माबाद :( अशोक पडोळे )

राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर धर्माबाद येथील इयत्ता पहिली व दुसरीच्या एकूण ११० विद्यार्थ्यांसाठी परभणी येथील प्रसिद्ध सरदेशपांडे हुरडा पार्टी येथे एकदिवसीय शैक्षणिक व मनोरंजनात्मक सहल अत्यंत उत्साहात पार पडली.या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना निसर्गाच्या सान्निध्यात ग्रामीण जीवनशैली, शेतीसंस्कृती तसेच पारंपरिक हंगामी अन्न असलेल्या ताज्या हुरड्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची विलक्षण संधी मिळाली. शेतातील वातावरण, हिरवाई आणि ग्रामीण संस्कृतीचा सहवास यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.



विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी विशेषरित्या आयोजित करण्यात आलेल्या मॅजिक शोने चिमुकल्यांचे विशेष आकर्षण वेधून घेतले. विविध खेळ, उपक्रम व स्वादिष्ट हुरड्याचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांनी सहलीचा मनमुराद आनंद लुटला.

लहान वयाच्या विद्यार्थ्यांचा विचार करून ही सहल पूर्णतः सुरक्षित, शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यात आली. संपूर्ण सहलीदरम्यान मार्गदर्शक शिक्षकांची सतत देखरेख होती. विद्यार्थ्यांसोबत प्राथमिक विभागाचे उपप्राचार्य सुजित देशपांडे सर तसेच १२ महिला शिक्षक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनुभवाधारित शिक्षणाला चालना मिळाली असून ग्रामीण संस्कृतीविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे, असे मत शाळेचे व्यवस्थापकीय संचालक मा. सुबोधजी काकाणी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. ही सहल विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, ज्ञानवर्धक व संस्मरणीय ठरल्याची भावना पालकवर्गातून व्यक्त होत असून, या यशस्वी व नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल धर्माबाद परिसरात ठघडतच् शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# २४ कोटी ९० लाखांच्या नैसर्गिक आपत्ती अनुदान घोटाळ्याला मोठा धक्का

## १८ आरोपींचा अटकपूर्व जामीन उच्च न्यायालयाने फेटाळला

जालना ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात नैसर्गिक आपत्तीच्या नावाखाली झालेल्या तब्बल २४ कोटी ९० लाख रुपयांच्या महाघोटाळ्याला मोठा धक्का बसला असून या प्रकरणातील १८ आरोपींचा अटकपूर्व जामीन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळून लावला आहे.त्यामुळे घोटाळेबाजांच्या अडचणी वाढल्या असून लवकरच अटक होण्याची शक्यता बळावली आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याचे खोटे दाखवून मोठ्या प्रमाणावर बोगस लाभार्थी तयार करून शासनाच्या अनुदानाची लूट करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.अंबड व घनसावंगी तालुक्यातील काही मंडळ अधिकारी,कर्मचारी व इतर संबंधितांनी संगनमताने शेती नसलेल्या व्यक्तींची नावे लाभार्थी यादीत समाविष्ट करून कोट्यवधींचा अपहार केल्याचा गंभीर आरोप आहे.

या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने सखोल तपास करून २४० गावांमध्ये २४,९०,७७,८११ रुपयांचा अपहार झाल्याचे उघड केले. तपासाअंती तब्बल २८ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ४५३/२०२५ अंतर्गत बीएनएसच्या विविध कलमांसह आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत कारवाई सुरू आहे.अटक टाळण्यासाठी आरोपींनी न्यायालयात धाव घेत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केले होते.मात्र तपासातील ठोस पुरावे, आर्थिक गैरव्यवहाराची गंभीरता आणि शासनाची मोठ्या प्रमाणावर झालेली फसवणूक लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने १८ आरोपींचे अर्ज ठामपणे फेटाळले.यामुळे आरोपींचे धाबे दणाणले असून पोलीस कारवाईला वेग येणार आहे.या सुनावणीदरम्यान सरकारतर्फे मुख्य सरकारी अभियोक्ता व सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी प्रभावी युक्तिवाद मांडत आरोपींच्या गैरकृत्यांचा पर्दाफाश केला.तर आर्थिक गुन्हे शाखा जालना, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि संबंधित तपास पथकाने सादर केलेले पुरावे न्यायालयाने ग्राह्य धरले.या निर्णयामुळे नैसर्गिक आपत्तीच्या नावाखाली गरीब शेतकऱ्यांच्या हक्कावर डल्ला मारणाऱ्या घोटाळेबाजांना मोठा हादरा बसला असून अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाईचा स्पष्ट संदेश गेला आहे.आता या प्रकरणात पुढील आरोपींवरही कडक कारवाई होण्याची शक्यता असून, कोट्यवधींच्या अपहाराचा संपूर्ण सत्य बाहेर येईल अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# दापोलीत संत भगवानबाबा व वामनभाऊ महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा उत्साहात संपन्न!

दापोली ।प्रतिनिधी

ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा व वैराग्यमूर्ती पूज्य वामनभाऊ महाराज यांच्या संयुक्त पुण्यतिथीनिमित्त आयोजित स्मृतिसोहळा शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी दापोली येथे अत्यंत भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दापोली व परिसरातील वंजारी समाजातील नागरिक, अधिकारी, कार्यकर्ते व भाविकांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थिती लावून या कार्यक्रमाला शोभा आणली.

कार्यक्रमाची सुरुवात पद्मश्री दादा ईदाते यांच्या शुभहस्ते झाली. पद्मश्री दादांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्यासोबतच्या सामाजिक कार्याच्या आठवणी सांगत उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळी संस्थेच्या अध्यक्षा संपदा पारकर यांनी आज वंजारी समाजातील युवक विविध क्षेत्रांत अधिकारी म्हणून यशस्वीपणे कार्यरत आहेत, ही समाजासाठी अभिमानाची बाब आहे, असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली यांनी शिक्षण, स्पर्धा परीक्षा व समाजातील तरुणांच्या प्रगतीबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ महिला आघाडी, महाराष्ट्र यांनी कुटुंबसंस्कार, शिक्षण आणि सामाजिक अस्मिता यांचे महत्त्व स्पष्ट करत मी वंजारी आहे ही ओळख अभिमानाने जपा, असा संदेश दिला.सायंकाळी ह. भ. प. सुदर्शन महाराज शास्त्री (पाथर्डी) यांच्या प्रभावी प्रवचनाने कार्यक्रमाला आध्यात्मिक उंची प्राप्त झाली. देव कुणाला प्रत्यक्ष दिसत नाही



या विषयावर त्यांनी शिक्षणाच्या महत्त्वाचे अत्यंत हृदयस्पर्शी उदाहरण सांगत समाजाला दिशा देणारे विचार मांडले. त्यांनी सांगितलेली कथा उपस्थित भाविकांच्या मनाला स्पर्श करून गेली.या पुण्यतिथी सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे कोणताही औपचारिक अध्यक्ष अथवा संयोजक नसतानाही सर्व समाजबांधवांनी एकत्र येत सामूहिक नियोजनातून हा उपक्रम अत्यंत यशस्वी केला. प्रवचनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसाद व स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल गोकुळ घुले यांनी सर्व समाजबांधवांचे मनःपूर्वक आभार मानले.

# दावरवाडी न्यू हायस्कूल शाळेत राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी....!

दावरवाडी ।प्रतिनिधी

दावरवाडी येथील न्यू हायस्कूल उच्च माध्यमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली प्रथम राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शाळेच्या वतीने व विद्यार्थ्यांनी वंदन केले काही विद्यार्थिनी राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा करून भाषणं केले



१२ जानेवारी राजमाता जिजाऊ जयंती बहुजन समाजाची माता स्वराज्य संस्थेची जननी आणि महाराष्ट्राच्या मातृत्वाचे सर्वोच्च उंची महाराष्ट्राच्या इतिहासात काही व्यक्ती अशा आहेत ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या आयुष्य पुरते मर्यादित राहत नाही ते कार्यपिढ्यांना पिढ्या समाजाच्या रक्तात मिसळते राजमाता जिजाऊ या अशाच महान व्यक्ति महत्त्वांपैकी एक आहेत १२ जानेवारी हा दिवस केवळ एका मातृ जन्माची आठवण करून देत नाही तो महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक आणि वैचारिक जडणघडणीचा पाया आठवन करून देतो १२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्राला सांगतो जर स्वराज्य टिकवायचे असेल तर जिजाऊंचे संस्कार जपावे लागतील जर समाज सशक्त करायचा असेल तर मार्तुत्वाला मूल्यांची दिशा द्यावी लागेल राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त असे अनेक भाषणे केली आज जयंती निमित्त मुला मुलींना या भाषणात भाग घेतला होता यावेळी उपस्थिती शाळेचे मुख्याध्यापक सुदाम गोजरे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राम तांगडे शाळेय समीती अ.शाम तांगडे पर्यवेक्षक निंबाळकर सर के.कनके वाघ शेख धापसे खवले पांडव सर गोरडे मुळे खांडे सर चिदे सर पोकळे सर भंडारी सर बांदल सर आंधळे सर गलांडे सर पठाण सर बावणे सर डुकरे सर चव्हाण. पोकळे सर एस. घुंगासे गोविंद चित्रे काळे केंद्रे मॅडम मुळे मॅडम गायकवाड मॅडम व शिक्षक शिक्षकेतर यावेळी उपस्थित होते

# आनंदनगरीसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना प्राप्त होते आर्थिक ज्ञान – सरपंच दिपिका ढाले

जाफराबाद । हरी भालके

विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढावी, त्यांच्यातील न्यूनगंड दूर व्हावा व त्याचे मनोबल वाढून त्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी शालेय जीवनात आनंद नगरी सारख्या उपक्रम राबवल्याने त्यांना आर्थिक ज्ञान प्राप्त होते, असे प्रतिपादन घानखेड्याच्या सरपंच दिपिका परसराम ढाले यांनी केले आहे. जाफराबाद तालुक्यातील घानखेडा येथे जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आलेल्या आनंदनगरी मेळावा प्रसंगी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या.



या कार्यक्रमाचे उद्घाटन जवखेडा ठेंगच्या जनेश्वर आश्रमाचे मठाधिपती ज्ञानेश्वर माऊली यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जिजाऊ ग्रामीण विकास मित्रमंडळाचे अध्यक्ष संजय लहाने सामाजिक कार्यकर्ते परसराम ढाले मुख्याध्यापक गोपाल तादू चैतन्यकर, विल्लेकर, सरपंच भाऊसाहेब गाढे पोपा अरविंद ढाले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद सुरडकर उपाध्यक्ष अमोल वाघ, माजी सरपंच विजय बोराडे व शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य ग्रामस्थांची मोठ्या संख्येने प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना सरपंच ढाले म्हणाल्या की, मुले मोठी झाल्यावर सर्वजण नोकऱ्याला लागतात. असे नाही तर यातील अनेक जण उद्योग व्यवसाय उभारतात. त्यांना शालेय जीवनातच व्यवहाराचे ज्ञान आले तर ही मुले पुढे मोठे उद्योगपती बनतील. आपले कुटुब यांचे जीवनमान यशस्वी जगतील. म्हणून विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच व्यावहारिक ज्ञान मिळावे व अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना गणिती, व्यावहारिक, नफा, नोटा ,सामाजिक ज्ञान मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या आनंद बाजारात समोसा बोर, केळी पाणीपुरी, फळे भाज्या, स्टेशनरी, शालेय साहित्य जिलाबी, भजे, कडधान्य यासह विविध प्रकारच्या वस्तूंचे २५ स्टॉल लावण्यात आले होते यामध्ये जवळपास २५ते ३० हजाराची उलाढाल झाली व विद्यार्थ्यांना नफा तोटा काय आहे ते कळून व्यवहारिक ज्ञान मिळाले यावेळी मान्यवरांनी प्रत्येक स्टॉलला भेट दिली व विविध वस्तुंची खरेदी केली. कार्यक्रम यशस्वितेसाठी मुख्याध्यापक तथा शाळेच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतल.घानखेडा येथे आनंदनगरीत विविध वस्तुंची खरेदी करतांन हभप ज्ञानेश्वर माऊली, संजय लहाने , सरपंच ढाले व ग्राहक (छायाः

# वर्धमान महावीर इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचा कलाविष्कार

## महिला सशक्तीकरणाचा प्रभावी संदेश

आष्टी (राजेंद्र लाड)

वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल, कडा (सीबीएसई बोर्ड मान्यताप्राप्त) या शाळेचा 'उडाण – २०२५' हा १४ वा वार्षिक स्नेहसंमेलनाचा भव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत सामाजिक जाणीव जागृत करणारा हा कार्यक्रम उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.




या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सीबीएसई बोर्ड, सीओई पुणे येथील सेक्शन ऑफिसर श्रीमती पल्लवी माळी मॅडम तसेच आष्टी येथील कर्तव्यदक्ष नायब तहसीलदार श्री. भागीरथ धारक साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन एसबीआय बँकेचे मॅनेजर श्री. प्रशांत झाडे साहेब यांच्या शुभहस्ते पार पडले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. अमित राठोड, उपाध्यक्ष श्री. संदिप चांनोदिया, सचिव श्री. हेमंत मेहेर, कोषाध्यक्ष डॉ. प्रमोद भळगट यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी श्री. मनीष गांधी, श्री. प्रकाश श्रीश्रीमाळ, श्री. अमोल पटवा, श्री. संजय पितळे, श्री. संतोष गांधी, सल्लागार पी. जी. मेहेर, मुख्याध्यापक श्री. अभिलाष के. के., उपमुख्याध्यापिका श्रीमती अफशान शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना महिला सशक्तीकरण या विषयावर आधारित होती. समाजातील महिलांना रूढीवादी विचारसरणी व भेदभावातून मुक्त करून त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत समान हक्क व संधी मिळाव्यात, यावर आधारित प्रभावी नाटिका व नृत्याविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केले. चिमुकल्यांच्या अभिनयाने, भावस्पर्शी सादरीकरणाने व उत्कृष्ट नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमादरम्यान पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले. शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संस्कारक्षम उपक्रमांचीही त्यांनी प्रशंसा केली.या कार्यक्रमाला कडा व परिसरातील पालकवर्ग तसेच विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रमपूर्वक नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी शाळा व्यवस्थापनाचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# साई मॉर्डन इंग्लिश स्कूल बदनापुर येथे राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

बदनापूर ।प्रतिनिधी

साई मॉडर्न इंग्लिश स्कूल येथे राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाच्या अध्यक्षा आदरणीय सौ. सूनिताताई गीते यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या कार्यावर तसेच स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित भाषणे, कविता व मनोगते सादर केली. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. करुणा जाधव यांनी स्वामी विवेकानंदांचे युवकांसाठीचे प्रेरणादायी विचार आणि राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत दिलेले संस्कार विद्यार्थ्यांनी देशसेवा, चारित्र्य, आत्मविश्वास व कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचा अंगीकार करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन सौ. स्नेहा अग्रवाल,शिल्पा नंद यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. स्नेहा बिहाडे यांनी केले. कार्यक्रम शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित पालक व मान्यवरांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती अशोका पब्लिक स्कूलमध्ये उत्साहात साजरी




डॉ आशिष तिवारी/मंठा

येथील अशोका पब्लिक स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या आदर्श मातृत्वावर तसेच छत्रपती शिवाजी महाराजांवर घडवलेल्या संस्कारांवर प्रभावी भाषणे सादर केली. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर आधारित विचार, सुविचार व प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांनी मांडले. उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका हा संदेश विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्यात आला.कार्यक्रमातून देशभक्ती, चारित्र्यनिर्मिती, आत्मविश्वास आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शाळेचे अध्यक्ष संजयकुमार चव्हाण यांनी विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा अंगीकार करून जीवनात यशस्वी व्हावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वंदना मोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षकवृंद प्रियांका चिंचणे, प्राजक्ता कुलकर्णी, धनश्री कापडे, स्वाती हिवाळे, आकांक्षा खरात, अश्विनी चंदेल, अनंत निर्वळ व ज्योती शहाणे यांनी सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# जाफराबाद येथे राजमाता माँसाहेब जिजाऊ जयंती उत्साहात साजरी



जाफराबाद : प्रतिनिधी

राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त जाफराबाद शहरातील राजमाता माँसाहेब जिजाऊ चौक येथे सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन व पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. यावेळी जाफराबाद नगरीचे नगरसेवक दिपक पाटील वाकडे, पंचायत समितीचे माजी सभापती साहेबराव कानडजे, संजयजी लहाने सर नगरसेवक अनिल बोर्डे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या त्यागमय, संस्कारशील व प्रेरणादायी जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकत छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महान राष्ट्रनायक घडविण्यात माँसाहेब जिजाऊ यांचे योगदान अतुलनीय असल्याचे नमूद केले.

राजमाता जिजाऊ यांनी दिलेले संस्कार, राष्ट्रप्रेम, स्वराज्याची प्रेरणा आणि समाजासाठी केलेले कार्य आजच्या पिढीसाठी आदर्श असल्याचे वक्त्यांनी सांगितले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली जबाबदारी असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना राजमाता जिजाऊ जन्मोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी या कार्यक्रमास प्रसिद्ध व्यापारी सईद भाई, अनिल वरगणे, मुख्याध्यापक उमेश दुनगहु, प्रकाश पठाडे,संपादक चेतन बायस यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक व व्यापारी क्षेत्रातील मान्यवर तसेच मोठ्या संख्येने जिजाऊ–शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.



परतूर ।तारेख शेख

येथील विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माननीय व्ही. बी. डोंबे (प्रथम न्यायालय), माननीय ए. बी. राऊत (सह दिवाणी न्यायाधीश) तसेच प्रशांत अंभोरे (न्यायालयीन कर्मचारी) उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद सेवा केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. डॉ. शेषराव बाहेकर बाबा होते. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिंदे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

दैनिक
समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय : झेनिथ अंतर्गत भव्य क्रीडा स्पर्धेचे आयोजन

नांदेड । प्रतिनिधी

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड येथील क्रीडा संकुलात वार्षिक क्रीडा महोत्सव झेनिथ अंतर्गत प्रथमच संस्थेतील विद्यार्थिनींसाठी विशेष भव्य क्रीडा स्पर्धेचे आयोजन दिनांक १० व ११ जानेवारी २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात व मोठ्या उत्स्फूर्त सहभागासह यशस्वीरीत्या पार पडले.

या ऐतिहासिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे नियामक मंडळाचे अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, संचालक डॉ. मनेश कोकरे, नियामक मंडळ सदस्य डॉ. धर्मपाल डोये, प्रा. डॉ. जे. व्ही. मेघा व विद्यार्थी कल्याण विभागाचे अधिष्ठाता प्रा. एस. बी. देठे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी प्रबंधक डॉ. बी. आर. बोंबडे, झेनिथ समन्वयक डॉ. जीत पाटील, प्रा. तिलक जाधव, क्रीडा प्रभारी बी. व्ही. कदम आदी मान्यवर उपस्थित होते.उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष सुनील रायठठ्ठा म्हणाले, आजच्या युगात विद्यार्थिनींनी प्रत्येक क्षेत्रात पुढे येणे ही काळाची गरज आहे. अशा क्रीडा स्पर्धांमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, शिस्त व संघभावना विकसित होतात. 'झेनिथ'च्या माध्यमातून संस्थेने उचललेले हे पाऊल समाजासाठी प्रेरणादायी आहे.

संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी सांगितले की, विद्यार्थिनींना क्रीडा क्षेत्रात संधी, सुविधा व आत्मविश्वास मिळावा हा संस्थेचा ठाम संकल्प आहे. म्हणूनच संस्थेमध्ये



अत्याधुनिक व भव्य स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्यात आला आहे. या सुविधांमुळे विद्यार्थिनी उत्कृष्ट खेळाडू म्हणून घडत असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करण्यास सज्ज होत आहेत. याच प्रयत्नांचे फलित म्हणून संस्थेतील काही विद्यार्थिनींची विद्यापीठ संघात निवड झाली असून त्यांच्या यशामुळे संस्थेच्या क्रीडा परंपरेला नवा गौरव प्राप्त झाला आहे.नियामक मंडळ सदस्य डॉ. धर्मपाल डोये म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे महिला सक्षमीकरण अधिक बळकट होते.प्रा. डॉ. जे. व्ही. मेघा म्हणाल्या, आजच्या विद्यार्थिनी उद्याच्या राष्ट्रनिर्मितीच्या मजबूत आधारस्तंभ आहेत.अधिष्ठाता प्रा. एस. बी. देठे यांनी सांगितले की, विद्यार्थिनींसाठी क्रीडा उपक्रम हे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे अत्यंत प्रभावी साधन आहे. क्रीडेच्या माध्यमातून शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण व संघभावना विकसित होऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो.या स्पर्धेत विद्यार्थिनींनी विविध वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कौशल्य स्पर्धा, मनोरंजक खेळ व संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी झेनिथ विद्यार्थी समन्वयक सागर ऊबाळे व त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.



नांदेड । प्रतिनिधी

नांदेड जिल्हा परिषदेत आज राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या हस्ते रातमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांच्यासह जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कुंटूर पोलीसांची धाडसी कार्यवाही
## ६ लाख ३१ हजारांचे गोवंश पकडले

नांदेड ।प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बरबडा दूरक्षेत्राच्या पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानुसार बरबडा पोलीस चौकीच्या पोलीसांनी पाठलाग करून कहाळा ते सोमठाणा रोडवर दोन पिकअप मध्ये घेऊन जाणारे गोवंश पकडून सात आरोपींना जेरबंद केले असून जवळपास ६ लाख ३१ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रविवार रोजी मुदखेड येथील बाजारातून गोवंश मास विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याची गुप्त खबर बरबडा दूरक्षेत्राच्या पोलिसांना मिळताच त्यांनी कुंटूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पाळत ठेवून पाठलाग करून पोलीस उपनिरीक्षक नागोराव पोले व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक



लक्ष्मण सोनकांबळे, पोलीस कॉन्स्टेबल बाराळे यांनी कहाळा ते सोमठाणा रोडवर रविवारी सायंकाळी साडेपाच वाजता दोन पिकअप मध्ये वासरासह सात गोवंश पकडून सात आरोपीवर पोलीस उपनिरीक्षक नागोराव पोले यांच्या फिर्यादीवरून कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पिकअप वाहन जप्त केल्याची माहिती मिळत आहे.

# त्रुटी पूर्तता शाळांच्या अनुदानाचा प्रश्न झाला गंभीर

## शासन आदेश असूनही लाभ नाही ; शिक्षक-कर्मचाऱ्यांत तीव्र असंतोष

नायगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील त्रुटी पूर्तता शाळांवरील अन्याय पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासन निर्णय असूनही अनेक शाळांना अद्याप अनुदानापासून वंचित ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात उच्चस्तरीय बैठक घेण्याची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे.

ग्रामीण व शैक्षणिकदृष्ट्या मागास भागात शिक्षणाची पोकळी भरून काढण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या अंशतः विना अनुदानित त्रुटी पूर्तता शाळांनी गेल्या अनेक वर्षांपासून शासनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली आहे. मात्र, प्रत्यक्षात या शाळांना न्याय मिळत नसल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

**१४ ऑक्टोबर २०२४ चा शासन आदेशही कागदावरच**

३० दिवसांत त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेशानुसार मान्य वेतनश्रेणीतील टप्पा वाढ व अनुदान देणे अपेक्षित होते. तथापि, आजही अनेक पात्र शाळांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. परिणामी शिक्षकांचे आर्थिक नुकसान होत असून शाळांचे व्यवस्थापन डबघाईस आले आहे.

**पटसंख्येच्या अटीमुळे शाळा अडचणीत**

विशेष म्हणजे, शेवटच्या वर्गाच्या पटसंख्येच्या अटीमुळे सन २०२२-२३ मध्ये अनुदानापासून वंचित राहिलेल्या शाळांनाही अजूनही न्याय मिळालेला नाही. सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ मधील वाढीव पटसंख्या ग्राह्य धरून अनुदान द्यावे, अशी रास्त मागणी असूनही शिक्षण विभागाकडून ठोस निर्णय झालेला नाही.

**शिक्षक-कर्मचाऱ्यांचा संयम सुटण्याच्या मार्गावर**

या प्रश्नांसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वारंवार निवेदने दिली, पाठपुरावा केला, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे आता संबंधित मंत्री, वरिष्ठ अधिकारी व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह तातडीने बैठक घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे

**शिक्षण व्यवस्थेवर गंभीर परिणाम**

तज्ज्ञांचे मत आहे की, त्रुटी पूर्तता शाळा बंद पडल्यास त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांना बसणार आहे. शासनाने वेळेत निर्णय घेतला नाही, तर शिक्षणातील असमानता वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



## जात पडताळणी कार्यालयात, राजमाता माँ. जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

नांदेड । प्रतिनिधी

राजमाता माँ. जिजाऊंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी सिंदखेडराजा येथे झाला, तर स्वामी विवेकानंदांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला. या दोन्ही महान व्यक्तींची जयंती एकाच दिवशी, महाराष्ट्र आणि देशभरात त्यांचे कार्य, विचार आणि प्रेरणा यांचा गौरव करण्यासाठी दिनांक १२ जानेवारी रोजी. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड येथे समितीचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव श्री. रामचंद्र वंगाटे यांच्या हस्ते माँ. जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यालयात त्यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी, मुकुंद मुळे, सिद्राम रणभिरकर, विठ्ठल आडे, ज्ञानेश्वर गिरे, शिवाजी देशमुख, सोनू दरेगावकर, मनोज वाघमारे, ओमशिवा चिंचोलकर, रोहन देशमुख, अभिजित कदम, राजेश मेथेवाड यांच्यासह कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



नांदेड । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आज सोमवार, दि.१२ जानेवारी, २०२६ रोजी जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. पराग भालचंद्र, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, आयक्यूएसीचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमादरम्यान विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# किनवट नगर परिषदेत उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्य निवडीपूर्वी राजकीय नाट्य

किनवट । प्रतिनिधी

किनवट नगर परिषद येथे होऊ घातलेल्या उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीपूर्वी नांदेड येथे नाट्यमय राजकीय घडामोडी घडल्याने किनवटच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. विविध गटांमध्ये अंतर्गत मतभेद उफाळून आल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसून येत आहे.

स्वीकृत सदस्य पदासाठी एका गटाकडून प्रशांत कोरडे यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. तर दुसऱ्या गटाकडून माजी नगराध्यक्ष दीपक नेम्मानिवार यांचे नामनिर्देशन पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रताप पाटील चिखलीकर यांच्या निर्देशानुसार दाखल होणार होते. मात्र, प्रत्यक्ष नामनिर्देशन प्रक्रियेदरम्यान अनपेक्षित घडामोडी घडल्या.

नामनिर्देशन पत्रावर गटनेत्यांच्या स्वाक्षरीच्या टप्प्यावर माजी नगराध्यक्ष साजिद खान व राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते अभय नगराळे यांनी माजी नगराध्यक्ष दीपक नेम्मानिवार यांच्या नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करण्यास नकार दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या नकारामुळे पक्षांतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले असून, निवड प्रक्रियेवर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या संपूर्ण घटनेमुळे किनवट शहराच्या राजकारणाला वेगळे वळण लागले असून, आगामी काळात राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयात १३ जानेवारीपर्यंत नामनिर्देशन पत्र दाखल करणे अनिवार्य असून, त्या मुदतीत नामनिर्देशन न झाल्यास तांत्रिक अडचणी निर्माण होऊ शकतात, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

सद्यस्थितीत कोणता गट काय भूमिका घेतो, पक्षश्रेष्ठी यावर तोडगा काढतात का, तसेच अंतिम उमेदवार कोण असणार, याकडे किनवट शहरातील नागरिकांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. आज होणाऱ्या घडामोडींवरून पुढील राजकीय चित्र स्पष्ट होणार असल्याचे बोलले जात आहे.



## हाजी अब्दुल वहाब यांचे निधन

कंधार(प्रतिनिधी)

जुमापेठ येथील जेष्ठ नागरिक सेवानिवृत्त मुख्याध्यापक हाजी अब्दुल वहाब अब्दुल अजीज बागवान (वय ८५ वर्ष) यांचे वृद्धापकाळाने दि. ११ रोजी उपचार दरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कंधार येथील कब्रस्तानात दि. १२ रोजी दुपारी दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुलगे, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सहशिक्षक अब्दुल खय्युम यांचे ते वडील तर पत्रकार हफीज घडीवाला यांचे ते चुलते होत.